REFBK-0003688
REFBK-0003688

# श्रीगोसावित्रीस्तोत्र

८४६

नारायण नमस्तेऽस्तु देवेन्द्र भुवनेश्वर ॥ गोसावित्रीं प्रवक्ष्यामि व्यासेन कथितां पुरा ॥ १ ॥ गवां स्तोत्रं प्रवक्ष्यामि सर्वपापप्रणाशनम् । सर्वाभिष्टप्रदं दिव्यं सर्वमंगलदायकम् ॥ २ ॥ शृंगाग्रे रमते व्यासः स्वयं विष्णुर्जनार्दनः ॥ शृंगमूले स्थिता गौरी शृंगमध्ये सदाशिवः ॥ ३ ॥ मूर्ध्नि ब्रह्मा गुरुः स्कंधे ललाटे वृषभध्वजः ॥ कर्णयोरश्विनौ देवौ चक्षुषोः शशिभास्करौ ॥ ४ ॥ दंतेषु सर्व ऋषयो जिह्वायां च सरस्वती ॥ वसन्ति देवा उरसि जंघायां च समाश्रिताः ॥ ५ ॥ खुरमध्येषु गंधर्वाः खुराग्रे शशिपन्नगौ ॥ खुराणां पश्चिमे भागे त्वप्सराणां गणाधिपाः ॥ ६ ॥ श्रोणिप्रदेशे पितरो भ्रूमूले त्रिगुणाः स्मृताः ॥ ऋषयो रोमरंध्रेषु चर्मण्यपि प्रजापतिः ॥ ७ ॥ ककुदि द्यौः सनक्षत्रा पृष्ठे वैवस्वतो यमः ॥ अपाने सर्वतीर्थानि गोमूत्रे जान्हवी स्वयम् ॥ ८ ॥ दृष्टे पृष्ठे सदा लक्ष्मीर्गोमये वसति स्वयम् ॥ नासायामश्विनौ देवा ओष्ठौ वसति भामिनी ॥ ९ ॥ चत्वारः सागराः पूर्णा गवां ये च पयोधराः ॥ हुंकारेषु स्थिता देवी हुंशब्दे च प्रजापतिः ॥ १० ॥ सर्वा विष्णुमया गावः सर्वांगेषु च केशवः ॥ गावो ममाग्रतः सन्तु गावो मे सन्तु पृष्ठतः ॥ ११ ॥ यस्य गौस्तु गृहे नास्ति स्मशानसदृशं हि तत् ॥ सुरभिर्वैष्णवी माता नित्यं विष्णुपदे स्थिता ॥ १२ ॥ गोग्रासं च मया दत्तं सुरभे प्रतिगृह्यताम् ॥ गोग्रासस्तु विशेषेण करसम्पुटमात्रकः ॥ १३ ॥ शतब्राह्मणभोज्येन फलं वप्तुं समं भवेत् ॥ य इदं पठते नित्यं श्रुणुयाच्च समाहितः ॥ १४ ॥ ब्राह्मणो लभते विद्यां क्षत्रियो राज्यमाप्नुयात् ॥

३८८८

गर्भिणी लभते पुत्रं कन्या च वरमाप्नुयात् ॥ १५ ॥ सायंकाले पं
द्यस्तु विघ्ननाशमवाप्नुयात् ॥ अहोरात्रकृतं पापं जपतो नश्यति ध्रुवम्
॥ १६ ॥ फलं गोदानशतजं लभते नात्र संशयः ॥ गवां दृष्ट्वा
गवां स्पृष्ट्वा गवामंगानि नारद ॥ कंडूयनेन सर्वेभ्यो गोदानस्य फलं
लभेत् ॥ १७ ॥

इति श्रीब्रह्मांडपुराणे ब्रह्मनारदसंवादे गोसावित्रीस्तोत्रं संपूर्णम् ॥

## अर्थ

हे देवाधिदेव जगन्नाथ नारायणा, पूर्वी व्यासमहर्षींनीं वर्णिलेली गोसावित्री ( गोगायत्री ) मी सांगतों. १ सर्व पाप नाश करणारें गोदेवताचें स्तोत्र मी सांगणार आहें. तें दिव्य व सर्व कल्याणप्रद स्तोत्र सर्व मनकामना पूर्ण करणारें आहे. २ गाईच्या शिंगाच्या अग्रभागीं साक्षात् व्यासो नारायण विष्णु भगवान जनार्दन वसत आहेत; शृंगमूलाचे ठायीं गौरी व शृंगाचे मध्यभागीं सदाशिव राहात आहेत. ३ गाईच्या मस्तकावर ब्रह्मदेव, स्कंधप्रदेशीं गुरु, भालप्रदेशावर नंदिकेश्वर, दोन्ही कर्णांचे ठायीं अश्विनीकुमार व नेत्रद्वयांमध्यें चंद्रसूर्य असतात. ४ दंतांचें ठिकाणीं सर्व ऋषिसमूह, जिह्वेवर शारदादेवी नांदत असून वक्षःस्थळ व जंघा ह्यांचा देव आश्रय करीत आहेत. ५ खुरांच्या मध्यभागीं गंधर्व, अग्रभागीं शेष व उरग व खुरपृष्ठभागीं अप्सरांचे श्रेष्ठ गण राहातात. ३ कटिपश्चाद्भागाचे ठायीं पितर असून भृकुटिमूलाचे ठिकाणीं सत्त्वादि तीन गुण आहेत; रोमकूपांमध्यें इतर सर्व ऋषि वास्तव्य करीत असून त्वचेचे ठायीं प्रजापतिदेव असतो. ७ ककुत्प्रदेशीं ( वशिंड, मानेच्या मागले बाजूस ) सर्व नक्षत्रयुक्त अंतरिक्ष लोक, पृष्ठदेशीं सूर्यपुत्र यम, आपान वायुस्थानीं सर्व तीर्थे व गोमूत्रामध्यें प्रत्यक्ष

श्री गोवर्धन पद्यावली



ग्र. क्र. ५१७५.

भागीरथी स्वर्गंगा वास करते. ८ गाईच्या दृष्टींत, पृष्ठांत व गोमयांत स्वतः लक्ष्मी राहते. नासिकेच्या ठिकाणीं अश्विनौ देव व ओठांमध्यें भामिनी देवी आहे. ९ गाईचे स्तनचतुष्टय हे चार सागर होत. हुंकाराचे ठिकाणीं देवी व हुं शब्दांत (हंबरड्यांत) प्रजापति असतो. १० सर्व गायी विष्णुस्वरूप असून सर्व अंगांचे ठिकाणीं केशवदेव असतो. गायीं माझ्या अग्रभागीं (पुढें) असोत व गायी माझ्या पाठीशीं असोत. ११ ज्याच्या घरीं गाय नसते तें गृह स्मशान (मसणवटी) तुल्य होय. कामधेनु ही वैष्णवी माता असून नित्य विष्णुपदीं (गयेस) अधिष्ठित आहे. १२ हे सुरभे कामधेना, मीं दिलेला हा गोग्रास तूं ग्रहण करावास. विशेषेंकरून एक अंजली परिमित (ओंजळभर) असाही गोग्रास १३ व शत ब्राह्मणभोजन यांचें फल सारखेंच प्राप्त होतें. जो कोणी हें स्तोत्र एकाग्र चित्तपूर्वक पठण करील व श्रवण करील, १४ तो ब्राह्मण (असल्यास) विद्यासंपन्न होईल; क्षत्रियाला राज्य प्राप्त होईल. गरोदर स्त्रीला पुत्रलाभ (**मुलगा**) होईल व कन्येल उत्तम वर (नवरा) मिळेल. १५ जो सायंकाळीं ह्या स्तोत्राचा पाठ करतो त्याचीं संकटें दूर होतात; अहोरात्रीमध्यें केलेलें पाप निश्चयानें नाहींसें होतें. १६ व शतगोप्रदानाचें फल प्राप्त होतें; ह्यांत संशय नाहीं. गोदर्शन, गोस्पर्शन व गो-अंगकंडूयन (गाईचे अंगांना खाजवून कुरवाळणें) ह्या कृत्यांच्या योगानें सर्वांना गोप्रदानाचें फल प्राप्त होतें. १७ ह्याप्रमाणें श्रीब्रह्मांडपुराणांतर्गत ब्रह्मदेव व नारद ह्यांच्या संवादांतलि गोसावित्री—स्तोत्र संपूर्ण झालें.

---

# बालकरामदासकृत

## गोमातेची भूपाळी.

प्रात:काळीं उठा उठा । माते गायत्रीसी भेटा । अगाध सुकृताचा सांठा । मोक्ष दारवंटा उघडेल ॥ध्रु० ॥ हस्तें पृष्टी कुरवाळावी । कंडु ग्रीवा तोषवावी । पुच्छाग्रेंही मुखीं फिरवावी । गोमूत्र घ्यावें आवडीं ॥ १ ॥ कमलेची ही कनिष्ठ भगिनी । नामें कामधेनु जननी । इचा वास जयें स्थानीं । तये भुवनीं इंदिरा ॥२॥ प्रदक्षिणा तीन करितां । चरणी ठेवितां माथा । अनंत जन्मच्या दुरिता । हरण तत्त्वता करिती हे ॥ ३ ॥ श्रौत स्मार्त जीं जीं कर्में। इच्यानें पूर्ण सर्व कामें । संतवृत्तीं मनोधर्में । अकाम भावें नमियेलीं ॥४॥ इच्यानें मंत्र अर्घ्यदानें । सुरांसीं मोक्षमार्ग होणें । ब्राम्हणांचीं जीं ब्राह्मण्यें । वेदाध्ययनें इजयोगें ॥५॥ जिच्यानें रामकृष्ण अवतार जिच्यानें पृथ्वीचा उद्धार । जिच्यानें दैत्यांचा संहार । गो आधार विश्वाचा ॥६॥श्रुतिस्मृति पुराण संत । मुनिवर वसिष्ठादि विख्यात । गोकुळीं बालकृष्ण दिनरात । चरण रजांत लोळतसें ॥ ७ ॥

---

## काकड आरती.

तन मन धन हा त्रिगुण काकडा प्रेमघृतें भिजवा । भारत जनहो झोंप टाकुनी गोमाता रिझवा ॥ ध्रु. ॥ दैत्यलोक हे गोचि्३ बनुनी साधिताति दावा । बनुनी साधिताति दावा ॥ मांस रक्त हें खाण्या सजती समजुनी घ्या कावा ॥ यत्न बलानें काढुनि टाका राम शिरीं ध्यावा । सदोदित राम शिरीं ध्यावा ॥ विजयश्रीचा तिलक कपाळीं जनहो रमवावा ॥ कर्तव्यानें दक्ष होउनी लक्ष पदीं लावा । धेनुच्या लक्ष पदीं लावा ॥ तरीच जनहो भारतवासी सुदुल

नाका/५२ ७२५५

हे म्हणवा ॥ १ ॥ काळाचा काकडा जननी कृष्ण कुठें गेला । सुरभी देव कुठें गेला ॥ युगानयुगीं वेद मुखानें गौरविता झाला ॥ मच्छ कूर्म बनला । तुम्हांस्तव कूर्मवेष धरिला । सूकर नरहरि वामन द्विज-वर परशुराम झाला ॥ सहस्रार्जुनें जाच केला । तुजला बहु जाच केला । तव कैवारा क्षत्रियांतकर भार्गव अवतरला ॥ दिलीप नृप दास तुझा झाला । तव प्रसादें रघुकुलभूषण रामचंद्र दिसला ॥ त्वदिय ऋणमुक्त व्हावयाला । गोपवेषधर रूपमनोहर व्रजांत संच-रला ॥ पदरज धरी मस्तकाला । पंचप्राणें करी आरती ओवाळी तुजला ॥ केशव बाळरूप बनला । वेणु वाजवी तुम्हां रंजवी शरण पदाब्जाला ॥ २ ॥

---

## शेजारती

असुरवृत्तिच्या गाढ तमानें निशा पूर्ण झाली । वेदवंद्य ही श्रीगोमाता फार फार श्रमली ॥ ध्रु. ॥ भारत जनहो ऐक्यत्वाची करा शेज आतां । मतभेदाचे मत्कुण काढा स्मरा सुजनपंथा ॥ निजध-र्माच्या सुखसिंहासनिं बसवा गोमाता । प्रेमपलंगीं निजवा झडकरि काय वेळ आतां ॥ पंचप्राणें करा आरती जनहो या कालीं ॥ वेदवंद्य ही ॥ १ ॥ सगुणरूप हें आर्य-महींचें तत्त्व ज्यास कळलें । तोच भूपती आर्यजनाला विष्णुरूप गमलें ॥ गोछल करुनी भूप म्हणविती क्वचित जगीं भ्रमले । तिलक पुंसोनी सौभाग्याचें सोंग जसें सजलें ॥ स्वराज्य-लक्ष्मी श्रीगोमाता व्यास मुनी वदले । तिला नाशितां भूप करंटे संतमुखें ठरले ॥ परमपूज्यता प्रजाजनांची नाहीं तया वाली । राज्याअंतीं नर्क अशास्तव मर्यादा कथिली ॥ गुरु चरणाशीं विनंति करितां बाळ मिठी घाली ॥ वेदवंद्य ही श्रीगोमाता फार फार श्रमली ॥ २ ॥

## आरती.

( चाल—आरती भुवनसुंदरा )

धेनु माय जगज्जननी । लोकत्रयत्रितापशमनी ॥ अखिल जगतास मोक्षदानी । जिचेनी सालंकृत अवनी ॥ चाल ॥ निगमागमीं जिला गाती । वंदिति सुरवर मुनिजन । पुनित पतित जन । घेतां दर्शन सुखकर शिवसांबा । सुरभी सौख्यद जगदंबा। धेनु० ॥ १ ॥ गोमूत्रांत वसे गंगा । कमला गोमयांतरंगा । अखिल देवता जिच्या अंगा । सदा जी प्रियकर श्रीरंगा ॥ चाल ॥ जियेचे नेत्र सूर्य चंद्र । पहा उपेंद्र गोकुळीं । कृष्ण बाळ अवतार नखाग्रीं गोवर्धन धरुनी राक्षि गोवत्स कृपा करुनी । धेनू. ॥ २ ॥

---

# धेनुपाठ

## अभंग १ ला.

नमो नारायणा नमोजी देवेंद्रा । आधीं भुवनाधारा नमस्कारू॥ गायत्रीचें स्तोत्र व्यासांनीं वर्णिलें । तेंचि वाखाणिले अभंगासी ॥ पापातें संहारी इच्छा पूर्ण करी । अमंगल हरी गीत गातां ॥ शिंगावरी व्यास मध्यें सदाशिव । मुळापाशीं ठाव अंबिकेचा ॥ विष्णूचें स्वरूप गाईसी जाणावें । दैत्यास नेणवें बाळ म्हणे ॥

२

मस्तकीं तो ब्रह्मा स्कंधावरी गुरु। कपाळीं शंकरु वृषभध्वज ॥ अश्विनीकुमार कर्णासी साजिरे । नेत्र हे गोजिरे सूर्य चंद्र ॥ दंतांमाजि कवी जिव्हे सरस्वती । अमर शोभती उरूमाजी ॥ खुराग्रें पर्वत गंधर्व अप्सरा । श्रोणिदेशीं पितरां वास झाला ॥ भृकुटीं त्रिगुण

आवा म. उपार

रोमीं ऋषी वास । चर्मी प्रजापातिस ठाव दिला । मर्कटासी रत्न गर्दभा मिष्टान्न । धेनु नसे मान्य चांडाळासी ॥ बाळ म्हणे जाणा शुद्ध ज्याचें बीज । धेनु त्याला पूज्य देवापरीं ॥

३

गोमयांत लक्ष्मीं गोमुत्रांत गंगा । येती पापभंगा सर्व तीर्थें ॥ चारींही सागर स्तनामाजीं जाणा । तिचा माहिमा कोणा वर्णवेना ॥ पुच्छामाजीं नाग वाय सांगूं मात । विष्णुरूप संत सेवितातीं ॥ धेनु अग्रभागीं धेनुही पाठीशीं । धेनु सर्व देशीं राहो माझ्या ॥ गाईवीणं घर जाणावें स्मशान । बाळ म्हणे खूण अभक्ताची ॥

४

गाईशीं गोग्रास तुळसीचें पूजन । नंदाचा नंदन तेथें वसे ॥ शत ब्राह्मणांसी देतां अन्नदान । जाणा हें प्रमाण भारताचें ॥ ज्याचे घरीं गाय तेथें उणें काय । सर्वही अपाय नष्ट होतीं ॥ गाईशीं विकाल सुखासीं मुकाल । द्रव्यरूपें ध्याल नर्क हातीं । अस्सल जातीचा न करी निंद्य काम । सदा मेघःशाम तयापाशीं ॥ बाळ म्हणे माते नका लावुं डाग । सुखदुःख भोग दों दिसांचा ॥

५

पुच्छ फिरवावें सर्वांगा वरूनी । तया नारायण सांभाळील ॥ दारिद्र कलह रोग जाय दुरी । खेळतसे हरीं धेनुसंगें ॥ विधि हरिहर झाले तिचे दास । म्हणूनी बाळास ध्यास तिचा ॥

६

धेनु पाठ नित्य करील पठण । तया नारायण सांभाळील ॥ ब्राह्मणातें विद्या क्षत्रियातें राज्य । गर्भिणीते पूज्य पुत्र लाभे ॥ सायंकाळीं गातां विघ्न जाये दुरी । रात्रंदिनीं करी पठणासी ॥ सर्वे

१५१०८२८
८५१०२८



पाप नाश तोषे जगदीशि । ऋद्धि सिद्धि त्यास ओळंगती ॥ शत गोप्रदानें अर्थ घेतां चित्तीं । अखंड सांगाती पांडुरंग । दर्शनें स्पर्शनें महादोष जाती । पुराणें वर्णिती बाळ म्हणे ॥

७

आली महान दिपवाळी । धेनुमातेसी सांभाळी ॥ १ ॥ नको करू तिचा त्याग । तुला पावेल श्रीरंग ॥ २ ॥ घरीं तुळस आणि गाय । तेथें गोपाळाचे पाय ॥ ३ ॥ जेथें गायत्रीचा वास । त्याचा पांडुरंग दास ॥ ४ ॥ सर्व तीर्थें तयां ठायां । येती तयासी सेवाया ॥ ५ ॥ ऐसा गायत्रीचा माहिमा । बाळ म्हणे झाली समा ॥ ६ ॥

---

## गोपाळकाला.

( चाल—चंद्रकांत राजाची० )

आर्यपुत्र गोपाळ बना रे वेळ बहुत गेला । गोमातेचा नाश होतसे होय कसा काला ? ॥ धृ० ॥ गोपाळांनीं प्रळय मांडिला बघतां काय असे ॥ या काल्याचे वर्म नेणती सारे लोक पिसे ॥ ज्ञानेश्वर गुरु नाथ समर्था बघुनी येत हंसे ॥ निज धर्माचें कर्म नेणता झालें काय कसें ॥ दयाशून्य अनुयायी गण हा पाहुनियां अपुला ॥ गोमातेचा नाश होतसे होय कसा काला ? ॥ १ ॥ यमुनातीरीं खेळ मांडिला कृष्ण गडी ज्यांचा ॥ गोप--गोपि गो मिळुनि सारे जन तो दैवाचा ॥ पूर्ण ब्रम्ह हरि सर्वोत्तम प्रिय सखा गोवळ्यांचा ॥ हरि प्रसादा पात्र गोप हे लाग न अमरांचा ॥ गोपाल तुम्ही धेनुसी तोषवा भारत मातेला ॥ २ ॥ गोकुल कोठें श्रीहरि कोठें गोपाल न दिसती ॥ गोरस नसतां काला कैचा संत

२०५५२

तुम्हां हंसती ॥ शिवाजि बाजी वीर शिरोमणी खेद मनीं करिती ॥ नामधारि हे क्षात्रिय कां नच नामशेष होती ॥ षंढासम हो कैसे बघतां कर ठेउनि भाला ॥ गोमातेचा॥ ३ ॥उत्साहाचें तत्त्व शेवटीं जरि हृदयीं गवसे ॥ आर्यपुत्र हे जिवंत असुनी दिसती कां शवसे ? ॥ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र हे हरिभजनीं न वसे । हरिभक्तीचें वर्म जाणतां होती माधवसे ।। गोपालांची कंठी पडली न दिसे कामाला ॥ गोमातेचा ॥ ४ ॥ वैदिक शास्त्री पुराणीक हरिदास भक्त प्रभूचे।या काल्याचें वर्म जनाला वदोत निज वाचें ॥ श्रीहरिचें गो-दैवत असतां काय नसे यांचें ? । गोरक्ताचे पाट पाहुनि स्वस्थ हृदय कैचें ॥ आर्यधर्म हा त्वरित जागवा दान हेंचि बाला ॥ ५ ॥

---

## गवळण

मासिं बोलुं नको गोविंदा । मासि आला तुझा राग ॥ ध्रु० ॥ मजसाठीं अवतरलासी । मजसंगें क्रीडा करिसी । या वेळीं दडासि कशालारे ॥ मासि० ॥ १ ॥ मजसाठीं वेणू धरिली । मजसाठीं नामें वारिलीं । आजिं त्याचा डौल कशाला रे । मासि० ॥ २ ॥ मजसाठीं गोकुळवासी । वधिल्या त्वां दानवराशी । आजि त्याची कीर्ति कशाला रे । मसि० ॥ ३ ॥ मम पदरज माथां घेसी । गोवर्धन धारण करिसी । देशी कां ताव मिशाला रे ॥ मासि० ॥ ४ ॥ जरि असाशिल जित जगताला । तरि येशील आज बघण्याला । गोवध खल करिती कशाला रे । मासि० ॥ ५ ॥ रुधिराची वाहते यमुना । मांसाचे पर्वत नाना । या समयीं येशी कशाला रे । मसि० ॥ ६ ॥ जे भारतवासी संत । गोपाळ म्हणति निभ्रांत । म्हणुनी हे करिती काला रे । मासि० ॥७॥ श्रीविठ्ठल गोकुलनाथा । चरणावरी

धरितें माथा ॥ बघसी हा अंत कशाला रे ॥ मसि० ॥ ८ ॥ पूर्वी त्वां राक्षियलेसी । अजि बौद्ध होउनी बससी ॥ प्रभु खालीं बघसि कशाला रे ॥ मसि० ॥ ९ ॥ समचरण विटेवरि धरिसी । मज-साठीं विषमता वरिशी ॥ जघनी कर देसी कशाला रे ॥ मसि० ॥ १० ॥ सज्जनगण मज विस्मरला । वरपंगी अवघा भरला ॥ स्मित-वदनें बघसि कशाला रे ॥ मसि० ॥ ११ ॥ ये धांव यशोदा-बाळा । डरतोसि काय कलिकाला । निष्ठुर मी बोलुं कशाला रे । मसि० ॥ १२ ॥

---

## पद.

( चाल—चंद्रकांत राजाची कन्या० )

विघ्नांतक श्रीसांबनंदना जयजय गणनाथा । हस्त जोडुनी विनंति करितों पदिं ठेवुनि माथा ॥ धृ. ॥ रावण कपटी घोर तप करि सांब कृपेसाठीं । शीर्षें दाही अर्पण करितां तोषे जगजेठी । उठिं उठिं वत्सा तुष्ट मी झालों माग वरा कांहीं । भाषण ऐकुनी हर्षित राक्षस बोलें लवलाही ॥ गिरिजारमणा, नंदीवाहना स्वामि दिनानाथा । हस्त जोडुनी विनंति करितों पदिं ठेवुनि माथा ॥ १॥ भक्तवत्सला, भोलानाथा, स्वेच्छा नच कांहीं । मातेसाठीं कष्ट दीधले क्षमस्व मां पाही ॥ पार्थिव लिंगा पूजित जननी स्वात्मलिंग देई । " भोळा शंभू प्रसन्न झाला दिव्य लिंग देई " ॥ वृंदारक तै हड-बडले बहु म्हणती गणनाथा । हस्त जोडुनी विनंति करितों पदिं ठेवुनि माथा ॥ २ ॥ मत्त निशाचर अनर्थकारी त्यांतें मारावें । लिंग हिरावुनि अंकुश पाणी, संकट वारावें ॥ रत्नमर्कटा, क्षेत्र पापिया, खळास लिंग तसें । "लिंग नव्हे हा प्राणचि आमुचा रावण

वा.काव्य.२०८
~~संग्रह~~ ७०८८



नेत असे " ॥ नारदोक्त हितमंत्र परिसुनी प्रार्थिलि गोमाता । हस्त जोडुनी विनंति करितों पदि ठेवुनि माथा ॥ ३ ॥ " श्रीजगदंबे मूल कदंबे येई अविलंबे । दानवदर्पे देव कष्टती साह्य करीं अंबे ॥ कृपाकटाक्षें निजभक्तांचें संकट दूर करी । मत्त करीसा राक्षस निवटुनि सुरनरदु:ख हरी ॥ विश्वपोषणें देवी म्हणती तुजासि ' जगन्माता ' । हस्त जोडुनि विनंति करितों पदिं ठेवुनि माथा ॥ ४ ॥ " धेनुप्रसादें राक्षस फटवुनि गोकर्णीं ख्याती । केली, हर्षे देववृंद तैं पुष्पवृष्टि करिती । त्या धेनूचीं आजि विस्मृती झाली कां देवा । शरण तुजविना कुणासि जावें, त्रास न मानावा ॥ अनंत हस्तें साह्य करावें रक्षीं गोमाता । हस्त जोडुनी विनंति करितों पदिं ठेवुनि माथा ॥५॥

---

### करवीरवासिनी श्रीमहालक्ष्मीस्तोत्र

## दे भेट नारायणीं

माते जन्म असंख्य घेउनि पुन्हां गेलों कृपेवांचुनी । जाणें मी अपराध घोर घडला प्रार्थूं कुणा लागुनी ॥ पोटीं घालिल कोण गे तुजविना हें सांगसी तुं झणी । आला बाळ पदांबुजी शरण हा दे भेट नारायणी ॥ १ ॥ माते त्वद्गुणवृंद वर्णिति सदा शास्त्रें पुराणें श्रुती । गाती भक्त असंख्य मुक्त असुनी वर्णूं कसा दुर्मती ॥ लागो वृत्ति सदा मनोरथ असा त्वत्कीर्ति-पारायणी । आला बाळ पदांबुजीं शरण हा दे भेट नारायणी ॥ २ ॥ नाहीं ज्ञान विरक्ति भक्ति लवही ना अल्प सत्संगती । विद्या वैभव ना कला कुशलता नांदे सदा दुर्मति ॥ कामादीं करिती मदीय हृदयीं दुर्वासना लावणी ।

आला बाळ पदांबुजीं शरण हा भेट नारायणी ॥ ३ ॥ ऐसा पापानिधी परी म्हणवितों त्वद्बाल गे माउली । सांभाळी निज ब्रीद सांड न करीं, देई कृपासाउली ॥ लागो सद्गुरु रामदासचरणीं हा देह सत्कारणीं । आला बाळ पदांबुजीं शरण हा दे भेट नारायणी ॥ ४ ॥ त्वत्सत्तेविण एक पत्र न हलें ख्याती पुराणीं अशी । सेवा धेनुपदीं सदा घडविणें ही दाद नाहीं कशी ! श्री शक्तीविण कोण कार्य घडवी भासे न कोणी धणीं । आला बाळ पदांबुजीं शरण हा दे भेट नारायणी ॥ ५ ॥ धर्मोद्धार करावयास दश जे अवतार त्वां घेतले । भक्तत्राण असंख्य दैत्य वधुनी जे भूतलीं मातले । कृष्णाचें रमणीय रूप धरिलें गो--गोपसंरक्षणीं । आला बाळ पदांबुजीं शरण हा दे भेट नारायणी ॥ ६ ॥ कोल्हासूर महाप्रमत्त वधिला गोधर्म रक्षावया । आतां गोजननीं असंख्य वधिती ये धांव-बोधावया ॥ देवी स्वात्मदशा न खिन्न बसणें गोवर्धनोद्धारिणी । आला बाळ पदांबुजीं शरण हा दे भेट नारायणी ॥ ७ ॥ शाहू छत्रपतीं नृपाल नगरीं नांदो आनंदें सदा । माते त्वत्कृपया अघोर कलिची हो नष्ट सर्वापदा ॥ अंबे आर्यकुलास भूषण असो यद्वंश--भूपाग्रणी । आला बाळ पदांबुजीं शरण हा दे भेट नारायणी ॥८॥ बाळाचा लडिवाळ पूर्ण करणें हें विश्वमातेकडे । अज्ञानी शिशुचें निरंतर पडे माते मनीं सांकडें । अंकीं घेउनियां कृपामृतपया पाजी दिनोद्धारिणी । आला बाळ पदांबुजीं शरण हा दे भेट नारायणी ॥९॥

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ठाणे.

## पद १० वें.

( चाल—हे नरा धीर धरि जरा० )

ही गाय जगाची माय, बाजारा नेसी, कसाबा देशी, मांगाला देसी, तिजसाठीं गुराखी झाला, सेवेनें धाला, सदा हृषकिशी ॥ध्रु॥ जै तुला जन्म जाहला, तुझ्या मातेला तनि दिवसांला, दूध नच आलें । तेधवा तुला या गाईनें वांचविलें ॥ ही गाय० ॥१॥ तिच्या पोटी नंदि जन्मला, तुला लाभला, शेतिला भला धान्य बहु घेसी, वस्त्र बहु घेसी, तयानें जगसी । थकल्यावर त्याला काय दलाला देसी ॥ ही गाय० ॥ २ ॥ परशुराम, आणिक श्रीराम, कृष्ण बलराम, पूर्ण निष्काम, परी सप्रेम, गोकुळीं सेवी । अशि गाय मानवा काय । कसाबा द्यावी ॥ ही गाय० ॥ ३ ॥ तिजसाठीं सकल अवतार, पृथ्वीचा भार कराया दूर, हरीहर आले । महा दैत्य मारिले ठार, सज्जनोद्धार जिच्यास्तव झाले ही गाय० ॥ ४ ॥ हा बाळ संत लडिवाळ, करा सांभाळ, वचन हें साचें । शिकविलें समर्थें नाहीं माझ्या मनिचें ॥ हीं गाय० ॥ ५ ॥

---

## पद ११ वें.

अहो आर्य जगीं विसरूं नका गाईना । किती आहे आमुची दैना ॥ ध्रु० ॥ नाहिं मिळत पहा खाण्यापुरता चारा । भंडवडा आमुचा सारा ।

(चाल) जागोजागी लागुनि पाठी । पाठीवरतीं मारुनि काठीं । नेती ओढोनी बांधुनिया शिंगांना । कोणाला येइना करुणा ॥ अहो० ॥१॥ दुध तूप दहीं देतों सकल जनाला । द्या कान तुम्ही विनतीला

(चाल)बोलायाला दिधली न वाणी । ऐका हंबरडा कानांनीं अहो माते परीं सकल आम्हीं हिंदूना । कोठें गेला तुमचा बाणा ॥ अहो. ॥ २ ॥

---

### पद १२ वें

( चाल—जमका अजब० )

भाई गोमाता पालो । तनका सार्थक यह करलो ॥ ध्रु ॥ भरतखंडके पुण्यभूमिसम नहिं दुसरी जगमो । निशिदिन उसपर गोखुन पडता लाव जरा कुछ मनमो ॥ १ ॥ गाय तुम्हारा धर्ममूल है अच्छा ये पहिचानो । धर्म बचाना हो तो उसके यह बिनतीको मानो ॥ २ ॥ " दौडो जल्दी भारतपुत्रो मेरे प्राण बचावो । कसाइयोंके तीक्ष्ण शस्त्रसे मजकू शीघ्र छुडावो " ॥ ३ ॥ ये तो गौकी बलहारी है मिलता तुमको खाना । बाळकृष्ण गुरुदास कहत है नहि तो मुष्किल बचना ॥ ४ ॥

---

### पद १३ वें.

( चाल— जमका अजब तडाखा बे. )

धेनू प्रार्थितसे सकलां । आमुचा विसर कसा पडला ॥ धृ० ॥ मम दुग्धानें तुम्ही वाढलां कारण तुमच्या शिशुला । सर्व सुखाकारण मी मजवरी प्रळयकाळ ओढवला ॥ १ ॥ हिंदुधर्म हा सिंधुपरी जो बिंदुमात्र कीं उरला । पुत्र मात्र नर कुपात्र घ्या खरमूत्र चहा कॉफीला ॥ २ ॥ धर्मवंत कुलवंत म्हणा श्रीमंत तोचि हो बनला । गाय माय करि हाय हाय अति पाहुनी जो कळवळला ॥ ३ ॥ वीर धरि मी थोर म्हणवि परि स्वधर्म सेवा चुकला । थोर न तो

जगीं चोर जन्मला वांझपणा मातेला ॥ ४ ॥ बाळ म्हणे प्रतिपाळ करा हा काळ नव्हें झोंपेचा सद्धर्माचा । अस्त होतसे अठवा निज बीजाला ॥ ५ ॥

---

# दसरा दिवाळी

## आर्या.

निर्धार घट स्थापा दीप स्वानंद लावुनी समया । धर्मप्रकाश टिकवा धर्मध्वज धेनु जातसे विलया ॥ १ ॥ नवविधभक्ती नवमी नवरात्रीं पूर्ण करुनि दसरा जो ॥ गाजो शिलगणाचा थाट सदा धर्म चौघडा वाजो ॥ २ ॥ विद्या सरस्वतीचें पूजन बलिदान षड्रिपु मारा ॥ सारा बंड तयांचें केलें विध्वंस अखिल सुविचारा ॥ ३ ॥ असंख्य अस्मद्बंधू-भगिनी त्या कोण संकटामाजीं ॥ राजी खुषी कशाची करुणार्णवा धांव धांव देवाजी ॥ ४ ॥ धर्मसिमोल्लंघन हें बघवेना आग मस्तकीं चढते ॥ कढतें काळिज रामा बरवें तरी शरिर आजि हें पडतें ॥ ५ ॥ काय जगा संकट हें नाहीं वस्त्रान्न प्यावया पाणी । रोगग्रस्त तशांतुनि वाली तुजविण नसे दुजा कोणी ॥ ६ ॥ हिरवें अन्न मिळेना कैचें पक्वान्न स्वप्निही विसरा । दसरा अतां कशाचा रघुपतिविण ना जगीं दुजा आसरा ॥७॥ माता क्लेशसमुद्रीं दसरा कोठें तुम्हां आम्हां सांगा । अंगार सुखा लागो शृंगारा विषय दुष्ट दुःसंगा ॥ ८ ॥ गोभक्ति-जागृतीचें सुवर्ण वाटूं परस्परें जगतीं॥ जगतीं असंख्य धेनू ज्यायोगें भारतासि हो सुगती ॥ ९ ॥ उत्सव विजयादशमी तरी आणा गो-सुवर्ण सदनासी। मदनाशी असुरांचा तो आणा रामचंद्र वनवासी ॥ १० ॥ धेनु सुवर्ण भाहिचें लुटलें

व्हा सावधान समयासी । कर्तव्या दक्ष नरा प्रेमें ओंवाळिती स्त्रिया दासी ॥ ११ ॥ तरि आर्यपुत्र म्हणवा शिणवा निजदेह धेनु रक्षाया पक्षाया विसरूं नका बाळाचें ध्या सुवाक्य लक्षाया ॥ १२ ॥

## दिवाली.

प्रथम दिबस वसुबारस पूजिति धर्मीं सवत्स धेनु पदा।म्हणुनी धनत्रयोदशि घडते कां प्राप्त होय ती अपदा ॥१३॥ धर्मविधी जो चुकतो चतुर्दशी प्राप्त त्यास नरकाची । धर्माची मर्यादा न त्याजितां पूजणें रमा साची॥१४॥गोक्रीडन-गोवर्धन-पूजा तो सुदिन पाडवा समजा।धेनू असंख्य मरती सण कसला व्यर्थ मांडिल्या गमजा ॥१५॥ आदित्यांनो तुमची भगिनी ही घोर संकटीं असतां । भाऊबीज तुम्हांला कोण करिल दुःख काय विस्मरतां ? ॥ १६ ॥

---

## अशी दिवाळी लाभो.

श्रीशिवराया तुम्हां सुखद हो येवो महीवरती । रामदास गुरु समर्थ चरणीं ज्याची अचलरती ॥ धृ० ॥ स्वरूप सांवळें सहित मावळे जंवते संचरती । असा सुदिन पाडवा दिवाळी लाभो अभिनवती ॥ लक्ष्मी पूजा—सदा अलंकृत आर्यधरा सुसती । नष्ट अमंगल सदा सुमंगल नामें उद्धरती

चालः—ही मौक्तिक जोडी राहित सुंदरी काय ॥ कीं मंगलसूत्रा वांचुनि न दिसे बरी । कुंकुम विराहित भाल पटल साजरी । श्रीशिवछत्रपती गुरु—समर्थ कां नच । अवतरती धर्मरवीचा अस्त होतसे कां न मनीं खंती ॥

---

## बाराखडी

ककका कां रे गाय भजाना माय जगाची ही असतां । खखा खाउनि दूध तियेचें स्वस्थ येधवां कां बसतां ॥ धृ० ॥ गगा गाती सुयश जियेचें वेदशास्त्र सुर सिद्ध मुनी । घघा घातक शत्रू बनल्या वंश तयांचे तुम्ही असुनी ॥ ङङा नाहीं काल तियेचा पालक गेले यमसदनीं । चचा चालक षंढ जहाले दुर्विकारवश दिनरजनीं ॥ छछा छळणा उलट तियेची करूं लागले आज जनीं । जजा जागत सदा बैसले स्वच्छंदानें दुर्व्यसनीं ॥ झझा झांकिति नेत्र कसे हो घर्मे दुर्दशा ही असुनी । ञञा यांना पुत्र म्हणाया लाज न वाटे कां स्वमनीं ॥ टटा टाकुनि आळस मनिचा उठा शवासम कां निजता ! ॥ खखा० ॥ ठठा ठाऊक असें तुम्हांला गोधन जातें सर्व लया ॥ डडा डळमळ गोधन करितें जात सर्वहि धर्म लया ॥ ढढा ढोंगी कितीक असती विद्वान म्हणविती परि न दया ॥ णणा गोधन रक्षाया आणि भक्ति मागती अल्प पया ॥ तता ताठा सोडुनि आपुला धर्म पहा, कां रे भ्रमतां ॥ खखा० ॥ थथा थारा निजधर्मा जे तेच फडकती महिवरती । ददा दानव संपत्तीनें भ्रमीत सदा नरकीं पचती ॥ धधा धक्के यमरायाचे खाऊनि रात्रंदिन रडती । नना करिती गोसेवेला म्हणुनी तयांला नीच गती ॥ पपा पंडित तोचि खरा जो सत्व दाखवी आचरितां ॥ खखा० ॥ फफा फरशु हातिं वागवी परशुराम धेनू साठीं । बबा बडवुनि क्षत्रियकुल हें यशध्वजा लावुनि मोठी ॥ भभा भजले रामकृष्ण ते वनीं हिंडती तिजसाठीं ॥ ममा मस्तकिं रेणु धरी अवतार घेउनि जगजेठी ॥ यया जनहो पहा गुरु श्री दत्तपृष्ठीं शोभे माता ॥ खखा० ॥ ररा रघुकुलमुगुटमणी श्रीराम जियेचा प्रसाद हा । लला लवले ब्रह्मऋषि पदपद्मीं महिमा अल्प न हा ॥ ववा वंदन करिति जगद्गुरु ईश जगाची जननि । श

(चाल)बोलायाला दिधली न वाणी । ऐका हंबरडा कानांनीं अहो माते परीं सकल आम्हीं हिंदूना । कोठें गेला तुमचा बाणा ॥ अहो. ॥ २ ॥

---

### पद १२ वें

( चाल—जमका अजब० )

भाई गोमाता पालो । तनका सार्थक यह करलो ॥ ध्रु ॥ भरतखंडके पुण्यभूमिसम नहिं दुसरी जगमो । निशिदिन उसपर गो-खुन पडता लाव जरा कुछ मनमो ॥ १ ॥ गाय तुम्हारा धर्ममूल है अच्छा ये पहिचानो । धर्म बचाना हो तो उसके यह बिनतीको मानो ॥ २ ॥ " दौडो जलदी भारतपुत्रो मेरे प्राण बचावो । कसा-इयोंके तीक्ष्ण शस्त्रसे मजकू शीघ्र छुडावो " ॥ ३ ॥ ये तो गौकी बलहारी है मिलता तुमको खाना । बाळकृष्ण गुरुदास कहत है नहि तो मुष्किल बचना ॥ ४ ॥

---

### पद १३ वें.

( चाल— जमका अजब तडाखा बे. )

धेनू प्रार्थितसे सकलां । आमुचा विसर कसा पडला ॥ धृ० ॥ मम दुग्धानें तुम्ही वाढलां कारण तुमच्या शिशुला । सर्व सुखाकारण मी मजवरी प्रळयकाळ ओढवला ॥ १ ॥ हिंदुधर्म हा सिंधुपरी जो बिंदुमात्र कीं उरला । पुत्र मात्र नर कुपात्र घ्या खरमूत्र चहा कॉफीला ॥ २ ॥ धर्मवंत कुलवंत म्हणा श्रीमंत तोचि हो बनला । गाय माय करि हाय हाय अति पाहुनी जो कळवळला ॥ ३ ॥ वीर धीर मी थोर म्हणवि परि स्वधर्म सेवा चुकला । थोर न तो

जगीं चोर जन्मला वांझपणा मातेला ॥ ४ ॥ बाळ म्हणे प्रतिपाळ करा हा काळ नव्हें झोंपेचा सद्धर्माचा । अस्त होतसे अठवा निज बीजाला ॥ ६ ॥

---

# दसरा दिवाळी

## आर्या.

निर्धार घट स्थापा दीप स्वानंद लावुनी समया । धर्मप्रकाश टिकवा धर्मध्वज घेनु जातसे विलया ॥ १ ॥ नवविधभक्ती नवमी नवरात्रीं पूर्ण करुनि दसरा जो ॥ गाजो शिलगणाचा थाट सदा धर्म चौघडा वाजो ॥ २ ॥ विद्या सरस्वतीचें पूजन बलिदान षड्रिपु मारा ॥ सारा बंड तयांचें केलें विध्वंस अखिल सुविचारा ॥ ३ ॥ असंख्य अस्मद्बंधू-भगिनी त्या कोण संकटामाजीं ॥ राजी खुषी कशाची करुणार्णवा धांव धांव देवाजी ॥ ४ ॥ धर्मसिमोल्लंघन हें बघवेना आग मस्तकीं चढते ॥ कढतें काळिज रामा बरवें तरी शरिर आजि हें पडतें ॥ ५ ॥ काय जगा संकट हें नाहीं वस्त्रान्न प्यावया पाणी । रोगग्रस्त तशांतुनि वाली तुजविण नसे दुजा कोणी ॥ ६ ॥ हिरवें अन्न मिळेना कैचें पक्वान्न स्वप्निंही विसरा । दसरा अतां कशाचा रघुपतिविण ना जगीं दुजा आसरा ॥७॥ माता क्लेशसमुद्रीं दसरा कोठें तुम्हां आम्हां सांगा । अंगार सुखा लागो शृंगारा विषय दुष्ट दु:संगा ॥ ८ ॥ गोभक्ति-जागृतीचें सुवर्ण वाटू परस्परें जगतीं॥ जगतीं असंख्य धेनू ज्यायोगें भारतासि हो सुगती ॥ ९ ॥ उत्सव विजयादशमी तरी आणा गो-सुवर्ण सदनासी। मदनाशी असुरांचा तो आणा रामचंद्र वनवासी ॥ १० ॥ धेनु सुवर्ण महिचें लुटलें

व्हा सावधान समयासी । कर्तव्या दक्ष नरा प्रेमें ओंवाळिती स्त्रिया दासी ॥ ११ ॥ तरि आर्यपुत्र म्हणवा शिणवा निजदेह धेनु रक्षाया पक्षाया विसरूं नका बाळाचें घ्या सुवाक्य लक्षाया ॥ १२ ॥

## दिवाली.

प्रथम दिवस वसुबारस पूजिति धर्मीं सवत्स धेनु पदा।म्हणुनी धनत्रयोदशि घडते कां प्राप्त होय ती अपदा ॥१३॥ धर्मविधी जो चुकतो चतुर्दशी प्राप्त त्यास नरकाची । धर्माची मर्यादा न त्यजितां पूजणें रमा साची॥१४॥गोक्रीडिन-गोवर्धन-पूजा तो सुदिन पाडवा समजा।धेनू असंख्य मरती सण कसला व्यर्थ मांडिल्या गमजा ॥ १५॥ आदित्यांनो तुमची भगिनी ही घोर संकटीं असतां । भाऊबीज तुम्हांला कोण करिल दुःख काय विस्मरतां ? ॥ १६ ॥

---

## अशी दिवाळी लाभो.

श्रीशिवराया तुम्हां सुखद हो येवो महीवरती । रामदास गुरु समर्थ चरणीं ज्याची अचलरती ॥ धृ० ॥ स्वरूप सांवळें सहित मावळे जंवते संचरती । असा सुदिन पाडवा दिवाळी लाभो अभिनवती ॥ लक्ष्मी पूजा—सदा अलंकृत आर्यधरा सुसती । नष्ट अमंगल सदा सुमंगल नामें उद्धरती

चालः—ही मौक्तिक जोडी राहित सुंदरी काय ॥ कीं मंगलसूत्रा वांचुनि न दिसे बरी । कुंकुम विराहित भाल पटल साजरी । श्रीशिवछत्रपती गुरु—समर्थ कां नच । अवतरती धर्मरविचा अस्त होतसे कां न मनीं खंती ॥

## बाराखडी

ककां कां रे गाय भजाना माय जगाची ही असतां । खखा खाउनि दूध तियेचें स्वस्थ येधवां कां बसतां ॥ धृ० ॥ गगा गाती सुयश जियेचें वेदशास्त्र सुर सिद्ध मुनी । घघा घातक शत्रू बनल्या वंश तयांचे तुम्ही असुनी ॥ ङङा नाहीं काल तियेचा पालक गेले यमसदनीं । चचा चालक षंढ जहाले दुर्विकारवश दिनरजनीं ॥ छछा छळणा उलट तियेची करूं लागले आज जनीं । जजा जागत सदा बैसले स्वच्छंदानें दुर्व्यसनीं ॥ झझा झांकिति नेत्र कसे हो धर्म दुर्दशा ही असुनी । ञञा यांना पुत्र म्हणाया लाज न वाटे कां स्वमनीं ॥ टटा टाकुनि आळस मनिंचा उठा शवासम कां निजता? ॥ खखा० ॥ ठठा ठाऊक असें तुम्हांला गोधन जातें सर्व लया ॥ डडा डळमळ गोधन करितें जात सर्वहि धर्म लया ॥ ढढा ढोंगी कितीक असती विद्वान म्हणविती परि न दया ॥ णणा गोधन रक्षाया आणि भक्ति मागती अल्प पया ॥ तता ताठा सोडुनि आपुला धर्म पहा, कां रे भ्रमतां ॥ खखा० ॥ थथा थारा निजधर्मा जे तेच फडकती महिवरती । ददा दानव संपत्तीनें भ्रमीत सदा नरकीं पचती ॥ धधा धक्के यमरायाचे खाऊनि रात्रंदिन रडती । नना करिती गोसेवेला म्हणुनी तयांला नीच गती ॥ पपा पंडित तोचि खरा जो सत्व दाखवी आचरितां ॥ खखा० ॥ फफा फरशु हातिं वागवी परशुराम धेनू साठीं । बबा बडवुनि क्षत्रियकुल हें यशध्वजा लावुनि मोठी ॥ भभा भजले रामकृष्ण ते वनीं हिंडती तिजसाठीं ॥ ममा मस्तकिं रेणु धरी अवतार घेउनि जगजेठी ॥ यया जनहो पहा गुरु श्री दत्तपृष्ठीं शोभे माता ॥ खखा० ॥ ररा रघुकुलमुगुटमणी श्रीराम जियेचा प्रसाद हा । लला लवले ब्रह्मऋषि पदपद्मीं महिमा अल्प न हा ॥ ववा वंदन करिति जगद्गुरु ईश जगाची जननि । श

शशा शंकरवहन जियेचा पुत्र प्रचीती जगीं अहा ॥ षषा षण्मुख बंधू गजमुख करि गोरक्षण दुखहरिता ॥खखा० ॥ ससा सर्व मतांचे सज्जन सेवन करिती पद्धूली । हहा हरिहर गाईसाठीं अवतरले हो घरातलीं ॥ ळळ् ळळ् ळळ् ळळ् कलिजिव्हा करि तया विषानें जन मरती । क्षक्षां क्षमा समर्थ ज्यांना धर्म सेवनीं परम रती॥ज्ञज्ञा ज्ञानाचे अधिकारी विश्वास ज्यांचा प्रभुवरता ॥खखा०॥ कृष्ण बाळ गोकुळीं खेंळतो उन्मनीं मुरली वाजविता ॥ माय यशोदा–प्रेमशिदोरी घेउनी स्वच्छंदें रमता॥सद्गुरु समर्थ करि गोरक्षण दासाचें मग कां चिंता॥ गुरुदास्याची ध्वजा उभारा काळ झडपितो कां निजतां॥ निजुं निजुं जाइल सर्वहि विलया येइ नरोटी मग हातां ॥ खखा० ॥

---

## चहाबाळाचा पाळणा.

बाळा जो जो रे चहाबाळा । लागो तव हा डोळा । चारी खंडासी । वेल्हाळा । अतितर प्रिय कलिकाळा ॥ बाळा० ॥ १ ॥ पालख लांबविला । या जगतीं । चैनज सम्यक प्रगती । बाळ जन्मलें व्यतिपातीं । अमावास्येच्या रात्रीं । परळ वाजविला । कलिराया रडविसी आयाबाया ॥ बाळा० ॥ २ ॥ येउनि चैनमुनी । सत्वर । सांगे जन्मांतर । बाळ राक्षस हें । साचार । मृत्युचाचि अवतार ॥ बाळा० ॥ ३ ॥ करील जगताचें । वाटोळें ! काढिल धर्मदिवाळें मुलगा कृष्णमुखी । निजलांळे । फांसुनि वदना काळें ॥ बाळा० ॥ ॥ ४ ॥ किटली कपबशी । आणि चमचा । स्टोव्ह हा ताईत साचा आणवा बाळाचा । झडकरी । मुलगा हा दैवाचा ॥ बाळा० ॥५॥ या तव बाळाची । नवलपरी । भजकातें संहारी वैऱ्या सुखदाता । संसारी । देह संपदा हारी ॥ बाळा०॥ ६ ॥ ‘ लिप्टन् ’ ‘ जाकोजा ’ । ‘ निलगीरी ’ । ‘ ब्रुकबाँड ’ ‘ डस्ट ’ विहारी ’ । यापरि

नामें हीं । अन्नधारीं । बालक पूर्ण विकारी ॥ बाळा० ॥ ७ ॥ गोरीपान असे । यद्रमणी । अशुद्धतेची खाणी । मोरस नांवाची । ही राणी । जी गोरक्ताभरणी ॥ बाळा० ॥ ८ ॥ या तव बाळाचे । भक्त अती । भजतिल सर्वहि जाती । संतासंत जनी । या पुजिती । सोवळ्या ओवळ्या युवती ॥ बाळा० ॥ ९ ॥ मूल निसंतानी । साचार । रोगांचें माहेर । यास्तव सोडावें । चहापाना । बालक विनवी चरणा ॥ बाळा० ॥ १० ॥

---

## वणवा पेटला !

### पद.

( चाल—सगुणगुणमाया० )

पेटला वणवा, येइना कुणाला कणवा ॥ धृ० ॥ सत्वरि उठा आर्यजन सारे । सुटलें घोर कलीचें वारें । दृढएकीचें जल उडवारे । धन्यचि म्हणवा ॥ येइना ॥ १ ॥ रक्षक तोची भक्षक ठरला । गोदुःखाला अंत न उरला । हिंदूजन हा नास्तिक बनला । समर्था विनवा ॥ येइना ॥ २ ॥ धेनुभक्त मिळुनियां आतां । सोडा मता-मतांच्या वार्ता । ठोका बोंब जागवा जनता । तनमन झिजवा ॥ ३ ॥ गोधन सर्व जळुनियां गेलें । आजवरि काय हातांसी आलें । लौकिक दंभें सर्वहि मेले । मनासी हिणवा ॥ येइना ॥ ४ ॥ बालक त्याचि प्रवाहीं पडला । म्हणुनी स्वानुभवें बडबडला । व्यर्थाचि अहंकार मनिं जडला । सेवक म्हणवा ॥ येइना ॥ ५ ॥

---

### पद १९ वें.

विश्वमाय ही गाय वांचण्या युक्ति असे साची । सर्व जनाच्या मनास वळवा वेळ न बसण्याची ॥ धृ० ॥ घरोघरा धेनूस

पाळणें हाच मंत्र सोपा । गोविक्री करणार तयाच्या जोड नसे पापा ॥ गोजननी त्या असंख्य मरती कोण करी मापा । धांवा धांव करा हा पडतो कलीकाल छापा ॥ गोसेवेची वेळ पातली तुम्हां सुदैवाची ॥ सर्वज० ॥ १ ॥ बाजारांतिल मार्ग रोधुनी बसा आर्य जनहो । उपदेशानें कंठ शोषवा गोवध ऐकुनि हो ॥ धन वाङ्मय उपदेशहि तिसरा त्रय तें अल्प न हो । गोवध बंद करूं हा निश्चय सकला हा पण हो ॥ धेनुरक्षणीं कंकण बांधा जननी विश्वाची ॥ सर्व० ॥ २ ॥ गो–रक्षाया पेढी स्थापा एक तरी मोठी वधिकापासुनि धेनु सोडितां हीच बुद्धि खोटी ॥ गोरक्षण विद्यालय काढा उपदेशक सृष्टी । विकणारांची क्रियाच हटवा कां होतां कष्टी॥ गोशाळा जरी असंख्य जाहल्या मूळ छेदण्याची ॥ बाळ म्हणे ही युक्ती चुकतां होय गतीं ॥ कैची० । ३ ॥

---

## पद २० वें.

काय करूं माउली तुझ्यास्तव नुमजे हें मजला । प्रळयकाळ पातला सुखें गोपाल कसा निजला ॥ धृ० ॥ परधर्मी नृप असे सुधारक पुत्र तुला विकिती । विश्वबीज तें कसें म्हणावें कुंठित होय मती ॥ त्यांतुनि हा दुष्काळ पेटला वणवा कर्मगती । दुर्धर माते मरण पावला वाटे गोपपती ॥ कां न आम्ही प्लेगांत संपलों उरलों मूढमती । आर्यकुलीं संतान जंत हे वृथा नरकिं पचती ॥ धेनुभक्षका आली दिवाळी होळि गोकुळाला ॥ १ ॥ प्र० ॥ हे गोपाळा नेई एकदां सर्व गोकुलातें । पदाब्जकमलीं आर्य--जनांचें सरलें मग नातें॥ गोकुलेश गोवर्धनधारी कोण तुला गातें । दयाघना तूं साह्य होशि तरी काय उणें मातें ॥ वृथा तुला हा बोल कशाला निष्फळ आर्जव तें । कानिं कपाळीं कोण आरडतो बैस एक चित्तें ॥ तव धेनू

दा. क्र. ३६८८

रक्षणा काय रे आळवूं धनिकाला ॥ २ ॥ प्र० ॥ गोभक्तांतहि ऐक्य मिळेना भिन्न मार्ग धरिती । उगें सभेमधिं बंड माजवुनि टाळि पिटुनि मरती ॥ सभा सोडितां चहा झोडिती फार श्रमित म्हणती । बहु गमतीचे ठराव लिहुनी भूपा पाठविती ॥ शून्य कृतीला सुयश कशाचे वृथा दंभ धरिती । स्थळोस्थळीं वाचाळ पसरले मीही त्याच रीती ॥ वदल्यासम चालणें जयाचें अचल नमन त्याला । बालकृष्ण पैजार तयाची लावि मस्तकाला ॥ ३ ॥ प्र० ॥

---

## श्रीविठ्ठलप्रार्थना.

( चाल—चंद्रकांत राजाची० )

धांव धांव रे सख्या विठ्ठला होऊं नको मंद । गोवर्धन करिं धरुनि राक्षिलें गोकुल गोवृंद ॥ धृ० ॥ गोप गायिंसी कालिय मर्दुनि वांचविलें देवा । इतुका हाता हृद्‌यीं तुमच्या प्रेमाचा ठेवा ॥ १ ॥ बकासुराचें मुख फाडुनियां गोधन वांचविलें । द्वापारींचें शौर्य कलीनें काय लुप्त केलें ॥ २ ॥ गाय विकाया पूजक तत्पर पाप पुण्य नच पाही । कटिं कर ठेवुनि स्तब्ध बैससी कैवारी तूं ही ॥ ३ ॥ गजेंद्राची हांक ऐकुनी धांवसी लवलाही । हंबरडा अजि आर्त गाइचा काय कानिं नाहीं ॥ ४ ॥ रामकृष्ण अवतार गाइच्या कैवारा घेसी । संप्रति निद्रित क्षीरसागरीं कां बा झालासी ॥ ५ ॥ हे करुणानिधि वरुणालय त्यजि त्वरें धांव देवा । ‘ गोपाळू ’ हें नाम सार्थकारिं करुनी गोसेवा ॥ ६ ॥ समर्थचरणीं हीच विनंति पूर्ण कृपा व्हावी । बालकदासा धेनूसेवा नित्य नित्य द्यावी ॥ ७ ॥

---

## श्रीरामवरदायिनी

नमस्ते अंबिके माते । नातें विस्मरसी कसें । पिसें हें बाळ सांभाळी । श्रीरामवरदायिनी ॥ १ ॥ राघवा वर देणारी । घेणारी प्राण राक्षसां । साक्षिणी सर्व जीवांची । श्रीराम.॥२ ॥ समर्थें धुंडिली माता । विघ्नवार्ता हरावया । दयाळू मूर्ति अंबेची ॥ श्रीराम० ॥३॥ समर्था पावली माता । धांवली संकटीं सदा । आपदा वारिते आतां । श्रीराम० ॥४॥ ऐकली ख्याति मोठी । समर्थ वदनांतुनी । ते पाय दाविते बाळा ॥ श्रीराम० ॥५॥समर्थवचनांसाठीं । पाठीं सद्धर्म घातला । मातला दैत्य माराया ॥ श्रीराम० ॥६॥ समर्था दिधली शक्ती । भक्ति वैराग्य संपदा । सर्वकर्ती जगन्माता ॥ श्रीराम० ॥७॥ अंबिके दैत्य संघासी । उद्धवे धाक तेधवां ॥ एधवां नुद्धवे कैसा ॥ श्रीराम० ॥८॥ जननी जाणलें चित्तीं । वासरूं न दिसें तुला प्रेमपान्हा कसा यावा ॥ श्रीराम० ॥ ९ ॥ धांवसी धर्म रक्षाया । भक्षाया दैत्य मातले । लक्षा या समयीं अंबे । श्रीरामवरदायिनी ॥१०॥ तें प्रेम लोपलें कोठें । मोठें आश्चर्य वाटतें । दाटतें हृदय दुःखानें ॥ श्रीराम० ॥ ११ ॥ वेदवंद्य जगन्माता । गाय ही तव रूपिणी । वधिती साहसी कैसे ॥ श्रीराम० ॥ १२ ॥ बुद्धि दे आंग्ल भूपाला । बाळाचें हेंच मागणें । स्वधर्म रक्षिसी अंबे ॥ श्रीरामवरदायिनी ॥ १३ ॥

---

## मां पाहि रामेश्वरा.

मायेचा जनिता तिला प्रशमिता विश्वास संरक्षिता । ब्रह्मा विष्णु महेशरूप तवहें तूं विश्वमाता पिता । विश्वेशा त्रिपुरांतका त्रिनयना श्रीत्र्यंबका शंकरा । आला बाळ पदांबुजीं शरण हा मां पाहि रामेश्वरा ॥ १ ॥ नाहीं ज्ञान विरक्ति भक्ति लवही ना बुद्धि

३८०२१



शक्ती मला । नाहीं निश्चय एकही सुगमशा नामीं तुझ्या रंगला । ऐसा पामर हीन दीन खल मी इच्छीतसे आसरा । आला बाळ० ॥ २ ॥ गाती चार सहा तसेच अठरा त्वद्ब्रीद गंगाधवा । आलों ऐकुनि त्वत्पदीं पतित हा इच्छी कृपा वैभवा । जातो विन्मुख याचक प्रभुवरा श्रीमंत सर्वेश्वरा । आला बाळ० ॥ ३॥ दीनोद्धार करावयास प्रभुनें येथें तुम्हां स्थापिलें । ऐसें जाणुनि दीन चित्त सदया त्वन्नामिं हें गुंतलें । सेतुस्नान पदाब्ज दर्शन जया तो मुक्तिचा हो तुरा । आला बाळ ॥ ४ ॥ हे धेनू–सुत नंदिकेश्वरवरा देवास जागे करा । गेला धर्म समूळ भारतमही ये दुर्गतीच्या घरा । मातेच्या तुमच्या भयंकर गती सांगाल कां ईश्वरा । आला बाळ ॥ ५ ॥ हे माते जगदंबिके नगसुते जागे करा शंकरा । धेनूरूप धरोनि आज चरणीं आक्रंदते ही धरा । पोरांचा छल हा कली करितसे सांगाल कां ईश्वरा । आला बाळ० ॥ ६ ॥ श्रीमद्राघव पादपद्म भ्रमरा श्रीमारुती राजया । माया पातळ आज काय करणें सद्धर्म जातो लया । पूर्वी श्रीच समर्थरूप धरूनी संरक्षिली ही धरा । आला बाळ०॥ ७ ॥ तीर्थांनों ममचित्त तीर्थ बनवा श्रीरामभक्ती-बळें । श्रीमत्सगुरु दास्य तुंबळ असें येवो तरंगागळें । तीर्थेशा जगि धन्य धन्य जाहला पाहोनी सीतावरा । आला बाळ०॥ ८ ॥ अठ्ठा पद्म हरी सहीत प्रभुला रत्नाकरा पाहिलें । संतांच्या करिंचे अहा निज शिरीं पाषाण ते वाहिले । सेतू तीर्थ महा विमुक्त पुरिचा झेंडाच कीं साजिरा । आला बाळ० ॥ ९ ॥

शंकर भक्त म्हणवितो व्हावा गोरक्षणासी अनुकूल ।
वृषभध्वज वहनाच्या मातेचें होय आजि निर्मूळ ॥

---

कवि—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

मुमुक्षुकर्तेकृत.

## गाईचे उपकार

गायचि एका माय जगाची। कोण तिचे उपकार। गड्यांनो थोर तिचे उपकार ॥ १ ॥ हिरवा चारा खाऊनि सोडी तोंडि दुधाची धार। खचितचि अमृताची ती धार ॥ २ ॥ हिंदु यवन हा भेद नसे तिज ती सकळां आधार। गायचि सर्व सुखा आधार ॥ ३ ॥ शेतीचा ती प्राणचि केवळ धान्य कसें मिळणार। तिज-विण कोण कसें जगणार ? ॥ ४ ॥ आई केवळ बाळपणीं, ही जन्म वरी देणार। दुभतें पुष्टितुष्टिचे सार ॥ ५ ॥ देव वृंद हा धेनु शरीरीं तिजविण भव निःसार। गायचि श्रीकृष्णासी प्यार ॥ ६ ॥ गो-ब्राह्मण प्रतिपालनकर्ता भक्त शिवाजी फार। शिरीं घ्या गोसेवेचा भार ॥ ७ ॥ गोसेवा नच घडतां हातीं संसृति हा जोजार। सेवा हेंचि भवाचें सार ॥ ८ ॥ हिंदु यवन तुम्हि हिंदुबंधुहो ! गाईचे उपकार। आठवा मनांत वारंवार ॥ ९ ॥

---

कवि—यशवंत, चाफळ.

## ' जाते कां छाति फुटून '

( चाल—उद्धवा शांतवन. )

असलें हें दृश्य बघून। जाते कां छाति फुटून ॥ मार्तंड चढे मध्यान्हीं। टळटळींत मध्यावरतीं ॥ तरळ उष्ण मृगजळ लहरी। चोंहिकडे वणवण फिरती ॥ वाऱ्याच्या मधुनी मधुनी। झुळुकी परी उष्णचि येती ॥ चाल—पाषाण तडकुनी जाती। भूमीला भेगा पडती। दुष्काळ ज्वाला चढती। असलें हें दृश्य बघून।

जाते कां छाति फुटून ॥ १ ॥ गेलेली छाती फुटून । हा कोण मार्गें या बोला ॥ चिंध्यांचे गांठविलेलें । मुंडासें एक शिराला ॥ विभवशाली वस्त्राभरण । लंगोटी एकच त्याला । चाल—घामानें बहु डबडबलें । मुख मलूल अति झालेलें । मानेवरी कांठीं लोळे । कुणबी हा दीन बघून । जाते कां छाति फुटून ॥ २ ॥ सावकाश चाले कोण । कृश देही त्याच्या पुढुन ॥ शेवटचें साधन त्याचें जें उद्यास देइल अन्न ॥ म्हणसी कां धेनु तियेला । ती कल्पवल्लरी जाण ॥ चाल–अस्थि तिच्या नुसत्या बघुन । वाटेल भीति बहु म्हणुन । प्रभु पसरि त्वचा तिजवरुन ॥ हे विचार मनी उद्भवुन । जाते कां छाति फुटून ॥ ३ ॥ हैक हैक ऐसें म्हणत । चालला तिच्या विक्रीला ॥ खावया कण्या पोटभर । मिळतील उद्याला सकलां ॥ तुकतुकी याच आशेची । देइ धीर चालायाला ॥ चाल—परि सुरभिस आशा कसली । आधींच उपाशी दुबळी । चालतां चालतां थकली । मटकन ती बसली बघुन । जाते कां छाति फुटून॥४॥ दुर्दैवें गांजुनि गेला । चिडखोर वृत्ति मग बनली ॥ कल्पना कटू उद्भवल्या । देखोनी तिज बसलेली । आल्याच दिसापासुन ही लइ दशा आमुची झाली ॥ चाल—चल, ऊठ, हैक, गतकाळे । संतापुनि मालक बोले । काठीचे बसले टोले । मरणोन्मुख उठली बघुन । जाते कां छाति फुटून ॥ ५ ॥ शेवटची करुनि शिकस्त । गाय पाय हळुहळु टाकी ॥ शेवटच्या श्रांत स्वासीं । निज जीवित घटिका मापी । मुरडुनी धन्याला बघुनी । शेवटची करुणा भाकी ॥ चाल—पहिल्याहुन पाऊल दुसरें । टाकितसे ती जड भारें । बल तोंच संपलें सारें । ती पुनः बैसली बघुन । जाते कां छाति फुटून ॥ ६ ॥ पिडलेला पापी प्राणी । त्रासलाच कुणबी अगदीं ॥ कुठली मग करुणा माया । निज पोटा पुढती विपदी ॥ फिरवुनी मारली काठी ।

निज शक्ति खर्चुनी समदी ॥ चाल--घाव बसे मर्मस्थानीं । हंबरडा मग फोडोनी । ती प्राण देइ सोडोनी । निर्दया मृता ती बघुनी । जाते कां छाति फुटूनी ॥ ७ ॥ हाय गाय बघुनी मेली । आशेचा तंतू तुटला ॥ नैराश्य सभोंवतीं सारें अंधारी ये डोळ्याला ॥ आपटून हात कपाळीं । खेड्यांत जवळच्या गेला ॥ चाल—रस्त्यांत आडवी गाय । तडफडुनि हालवि पाय । धुगधुगी फक्त ती हाय । हें भिषण चित्र बघुन । जाते कां छाती फुटून ॥ ९ ॥ काव काव एकचि नाद । इतक्यांत कावळे जमले ॥ कसले ध्वनि वातावरणी ! । फडफडत गृध्र हे आले ॥ फाडफाडूनी तिज खाया । यमदूत मिषें ते आले ॥ चाल—ते पहाच फुटले डोळे । आंतडी पहा थरथरले । रोमांच, नेत्र ही मिटले । बोला हें चित्र बघुन । जाते कां छाति फुटून ॥ ९ ॥ पाहून घोर देखावा । हा पहा सूर्यही ढळला ॥ तो प्रसंग देखुनि वृक्ष । गाळिती अश्रु पर्णाला ॥ ते बघुनी पडति घेरे ह्या । ओसाड माळ रानाला । चाल—ऐकाहो पाषाणांनों । ऐकाहो वनदेवींनों । दुर्दैवग्रस्त जनांनों । द्या त्यांस आपुले कान । जाते कां छाति फुटून ॥ १० ॥ विछिन्न धेनु देहाच्या । भंवतीं ही भाषा उठली । कोपलास कां वनमाळी । पेटली पहा ही होळी । लाडकी तुझी ही गौळी । तुजविना कोण सांभाळी। चाल—निज करुणेची कर वृष्टि । बघ जनता झाली कष्टी। सौभाग्य वितरि भूपृष्ठिं । हें दारुण दृश्य बघून। जाते कां छाति फुटून॥ ११॥

---

## दैवाचा भेसूर खेळ

( चाल—उद्धवा शांतवन ०— )

हा सर्व हलकल्लोळ । दैवाचा भेसुर खेळ ॥ धृ० ॥ ही पूर्व देवता हंसली । परी उदासिनता वदनीं । उदयाचलीं भानू आला । परि भयाणता तत्किरणीं ॥ ही विहंगचमु किलबिलते । परि कर्कशता तद्गानीं । चाल:—हे सुटती शीतल वारे । परि थरथर देह थरारे । रम्यत्व संपलें सारें । आज कां वस्तुतिल सकल । दैवाचा०— ॥१॥ ती कारंजाची धारा । बंद जलाभावीं झाली ॥ तुळशिचें वाळले वाफे । चालल्या सुकोनि वेली ॥ हीं फुलें उपवनामाजीं । कोमेजुनि गळती खालीं ॥ चाल—हीं फूलपांखरें मेलीं ॥ मधुपावली कोठें गेली । शुष्कता उपवनीं आली । सर्वत्र अवस्था विकल । दैवाचा भेसु०— ॥ २ ॥ वरुणाची झाली वक्र । दृष्टी या देशावरती ॥ संपलें नद्यांचें पाणी । पात्रीं मग गोटे उरती ॥ खडखडीत झाल्या वापीं । बुडते ही केवळ नरटी ॥ चाल—शेतांत पिकें मग कुठलीं । रयतेची छाती फुटली । पोटाची चिंता उठलीं । हैराण जाहलें सकल । दैवाचा०— ॥ ३ ॥ या अशा विपत्कालांत । आपुल्या क्षुद्रशा उटजीं ॥ लावुनी हात नशिबाला । बसलेला दिसला बाजी ॥ रोजचेंच चिंतन होतें । चाललें मस्तकीं आजी ॥ चाल—आज काय खाऊं घास । परिवार गळ्याला फांस । काय घालुं आतां पशुस । हा कसा बसावा मेळ । दैवाचा० ॥ ४ ॥ गुडघ्यांतुन काढुन मान । पाहिलें तयानें पुढतीं ॥ तों बैल साश्रु नयनांनीं । फिराफिरुनि त्याकडे बघती । आशाळभूत निज दृष्टी । त्याकडे धेनु लावीती ॥ चाल—चरकलें तयाचें हृदय । हाय हा विभू किति अदय । कासया म्हणावें सदय ! वदनांतुनि आले बोल । दैवाचा भेसूर ॥ ५ ॥ जे चार गड्यांना बैल आवरतां आले

नव्हते ॥ हाय ! देह त्यांचे आतां । अस्थिचे सापळे होते ॥ ते कांतिहीन बहु दीन । पाहुनि मन न कसें द्रवतें ॥ चालः—जडपदीं जाऊनि जवळी । चुंबिली आपुली गौळी । बैसुनी खालीं ती ढाळी । अश्रूंची मोहनमाळ । दैवाचा० ॥ ६ ॥ संकल्प करुनि मनिं कसला आणिले बाहुनी लोक ॥ ठरवुनी आंकडे रुपये । घेतले मोजुनी रोख ॥ गोठ्यांतुन बैल गेले । छे! प्राणप्रिय ते तोक ॥ चाल— पातली भयंकर विपदा । अप्रिय तरि केला सवदा । त्यांत करीं गुजराण तदा । झाली मग चालू चूल । दैवाचा ॥ ७ ॥ दुष्काळ पातला घोर अन्नान्न दशा गरिबांची ॥ आजच्याहुनी दिन पुढचा । पायरीच परमावधिची ॥ एक वेळ एकच घास । एक वेळ उपवा-साची ॥ चाल—चौंहिकडे हाहाकार । जाहले लोक बेकार । जाति सोडुनी घरदार । जडहोइ पोटचें बाळ । दैवाचा० ॥ ८ ॥ बाजीची गौळी उरली । सकल मालमत्ता सरली ॥ शेवटीं तिच्या विक्रीची । काठिण महा घटिका ठरली ॥ ही विकूं कां नको ऐशी । बाजीची मति बावरली ॥ चाल—पोटाचा आंतुन चिमटा । मग करून हिय्या मोठा । मोकळा करी तो गोठा । मध्यान्ह कठीण हा काळ— दैवाचा० ॥ ९ ॥ एकदां घेतला पैका । फेंकिला परत जोरानें ॥ मारुनी मिठी गौळीला । चुंबिलें तिला प्रेमानें ॥ लागली भूक मज बाबा । म्हणतांच तोंच पोरानें ॥ चाल—हृदयास बैसला धक्का स्वीकारुनि सगळा पैका । आंवरिले आपुल्या शोका । बोले तो दावें खोल । दैवाचा० ॥ १० ॥ लाडके माउली गौळी । मुरडुनी नको पाहूस ॥ जा खुशाल त्याच्यासंगें । हीं टिपें नको गाळूस ॥ घातला आज पावेतों । काढुनी तोंडचा घास ॥ चाल—घांसतो आज मी टांचा । मग तुला घास तो साचा । कोठुनि गे आणायाचा कोपला कृष्ण घननळि । दैवाचा भेसु० ॥ ११ ॥ बाजीस सुचेना

कांहीं । मस्तकीं घाव जणुं पडती ॥ अन्नास रुची लागेना । हृदयाचे तुकडे तुटती ॥ दारांतुन गौळी जातां । हुरहूर लागली मोठी ॥ चाल—मनधांव तिजकडे घेई । तिजाविना दिसेना कांहीं । परि उपाय उरला नाहीं । लागलें तिचें जणुं खूळ । दैवाचा भेसु० ॥ १२ ॥ पातला दिवस त्यापुढचा । दारांत उभी ती गौळी ॥ त्या पुढती लागो पाठ । यापरी चार दिन आली ॥ परि खालावत गेलेली । तनु तिची हाय आढळली ॥ चाल—उगवला पांचवा दिवस । फिरुन ती उभी दारास । बाजीनें पाहुन तीस । गोंजारुनि दिधला कवळ । दैवाचा भेसु० ॥ १३ ॥ तों नवीन मालक आला । बांधिलें गळ्याला दावें ॥ फोडिला तिनें हंबरडा । विछिन्न हृदयही व्हावें ॥ निजदेह उपाशी तेथें । टाकुनी प्राण सोडावें ॥ चाल—हे तिथें पाहती सकल । त्या प्रेमळ पशुचें नवल । परि बाजी शोकाकूल । ढळढळां रडे तिज जवळ । दैवाचा भे० ॥ १४ ॥ बाजीस लागलें वेड । त्या पासुन मग गौळीचे ॥ ये 'गौळी! गौळी!' म्हणुनी । बेभान अंगणीं नाचे ॥ "कां पिकांत जासी हैक ।" बडबडे यापरी वाचे ॥ चाल—लागली झुंज रस्त्यांत । हैक, हैक ऐसें म्हणत । घुसलाच एकदां त्यांत गौळीचा पालनवाला । गौळीस्तव ऐसा मेला ॥ हा सर्व हल कल्लोळ दैवाचा भेसूर खेळ ॥ १५ ॥

---

# पद

## 'धनाची उधळपट्टी आणि भूतदयेची हाकाटी'

( चाल—भाव धरारे )

उघडुनि डोळे । बघ जरा आपुले चाळे ॥ धृ० ॥ कारंजाचें तुषार उडती । कीं तरुपासुन पर्णे पडतीं । तेवीं खिशांतुन पैसे गळती । परि पै तुजला । देववेन गोग्रासाला ॥ १ ॥ घृता सेवुनी ज्योती जळते । परी शेवटीं काजळ वमते । द्रव्य तेवीं संपुन जातें परि अंधार । पापाचा दाटे घोर ॥ २ ॥ ददात तुजला नच पैशाची धुंदपणें तव कृति पैशाची । होते हानी मानवतेची। जरा तरि कांहीं सावध हो बा लवलाही ॥ ३ ॥ विद्युत दिपावली तव सदनीं ।अहा तेवते ही दिन रजनी । दुष्कृत्यें तव टाकि झांकूनी । भूत दयेची ही गमते होळी साची । ॥ ४ ॥ जेवि दीपगृह जलधी माजीं । संतत जाणिव दे खडकांची । दीपावळी तंव तव सदनीची । निष्ठुरतेची । सूचनाच देते साची ॥ ५ ॥ तुझ्या दारिचें श्वान इमानी। भिकाऱ्यां-वरि जाइ धावुनी । टाकि तुझे ते श्रम वांचवुनी । तुझी प्रतिमाच । मजला तें गमतें साच ॥ ६ ॥ जासि फिराया मोटारींतुनी । कारण येऊं नयेत कानीं । निर्धन जनतेची रडगाणीं । हेतु असाच । तव मनिचा वाटे साच ॥ ७ ॥ मर्त्यलोकिच्या मूढ मानवा । ऐक भिकारी करिती गवगवा । घास न पोटीं सर्व मानवा । अशा या कालीं । कां दयां मना नच शिवली ॥ ८ ॥ प्रियापुत्र तव जेंवि सोइरे । तुझी माय ही तशी गायरे । तिचेच भारत परि तिज सारे । विसरले आज याची न केवि मनीं लाज ॥ ९ ॥ नाचरंग हे ऐसे करिसी । त्यांत दंग तूं कैसा होसी । काय पामरा म्हणु तरि तुजसी । हंबरे गाय । दे साह्य तिला तरि हाय ॥ १० ॥ कृपादृष्टीनें पाहि तुजवरी । सांप्रत

चंचल लक्ष्मी सुंदरी । घरीं धेनु कां नसे परि तरी । असा बेभान। झालास काय तूं सुजन ॥ ११ ॥ तुशी परिक्षा लक्ष्मी घेइल । बेगुमान तव वर्तन पाहिल । सोडुनि अंतीं तुजला जाइल । सावध होई । सत्वरीं सुपथ धरि कांहीं ॥१२॥ भूतदयेची धरुनि पताका । हो दाता तूं अनाथ लोकां । 'गोमाताकी जय' हें घोकां । सार्थकीं सारे । लागेल आयु धन तरिरे ॥ १३ ॥

---

कवि—टेकाडेकृत

## ये रे ये गोपाळा.

( चाल—सबसे राम० )

ये रे ये गोपाळा कोठें असती या वेळां ॥ ध्रु० ॥ कुठें वासरें कुठें धेनुका काय दशा त्यांची । अजुनि कळेना तुला माधवा गोष्ट बहू नवलाची ॥ १ ॥ दुष्ट कालिया-शिरीं नाचुनी कंस मर्दियेला । हृदय तुझें तें कुठें आजला बोल नंदबाळा ॥ २ ॥ भुकेजला तुज बघुनि स्रवती अपाप पयधारा । हीच कायरे कृतज्ञता ती विश्वाच्या आधारा ॥ ३ ॥ मिळवुनि भवती रंजविण्या त्या वाजविसी पावा । स्नेहाचा परिणाम आज त्या हाच काय गावा ॥ ४ ॥ म्हणवाया गोपाळ हवे तुज सदा सर्व काळ । विटंबना वारणें तयांची नको काय गोपाळ ॥ ५ ॥

---

# मंगलाष्टकें.

( १ )

पाळा गोधन हो तुम्ही बहुतसें रक्षा तया आदरें । कोणी बैल तशीच गाय आपुली विक्रीस न्या ना बरें ॥ त्यांच्या वृद्धपणीं तयास सुख द्या होऊं नका निष्ठुर । तुम्हां संतति संपति सुख सदा देवो रमेचा वर ॥१॥ झाली वृद्ध अशक्त पंगु जननी त्याज्या न ती सर्वथा। तैशी जी सकलेष्टकारिणि धना धान्यादि दे अमृता । जीचा पुत्र तुम्हां जनास्तवाची कीं हा ओढितो नांगर । त्या गाईस विकूं नका सुख तुम्हां देवो रमेचा वर ॥ २ ॥ झाला वृद्ध पिता वदा जन तुम्ही त्या कां हटीं मांडतां । वाटे लाज न कांहीं का निज मनीं बैला जई वेचितां । तुम्हा प्राप्त धनान्न वस्त्र अवघें ज्याच्याच कष्टावर । आपत्तींत जपा तया सुख तुम्हां देवो रमेचा वर ॥३॥ रक्षा माय समान गाय अपुली बैलास रक्षा बरें । कैशा'ही निज संकटीं विकुं नका तेणें बहु पापरे । गोशाळादिक स्थानिं न्या जई तुम्हां वाटे तयांचा भर । होवो मंगल सौख्य वैभव जनां कुर्यात् सदा मंगलम् ॥

—**अनंतदास**

---

( २ )

प्रारंभीं शुभमंगलार्थ स्वकरें धेनूपूजा आदरें । केल्या, धन्य गृहाश्रमीं प्रभुकृपें होतील तीं वधुवरें ॥ दीर्घायू धनधान्य, संतति जिच्या, आशिर्वचें सत्कुला । त्या धेनू-जननी नित्य भजुनी व्हा धन्य या भूतला ॥ १ ॥ लक्ष्मी गोमयिं वास नित्य करिते, गोमूत्र गंगाजल । क्षीराब्धी स्तनिं, नेत्रिं चंद्र सविता, सर्वासुरांचें स्थळ । जी देवी भुवनत्रयीं गमतसे आधार सन्मंगला । त्या धेनू-जननीस

नित्य भजुनी व्हा धन्य या भूतला ॥ २ ॥ ब्रह्मा विष्णु महेश ईश सकलां जी देवता शोभली । श्रीकृष्णें अवतार घेउनि जिला संरक्षिलें गोकुळीं । जी सौभाग्यखनीच आर्य महिला, जी कुंकुमाचा टिळा । त्या धेनू-जननीस नित्य भजुनी व्हा धन्य या भूतला ॥ ३ ॥ श्री वाल्मीक वासिष्ठ व्यास मुनिंना वेदांसही वंद्य जी । शास्त्रें जीस स्तवीत संतजनही सेवी प्रभू कृष्णजी । पृष्ठीं शोभत दत्तराज गुरुच्या देवीच जी चित्कला । त्या धेनू जननीस नित्य भजुनी व्हा धन्य या भूतला ॥ ४ ॥ राजा धन्य दिलीप थोर नृपती राणी सुदेष्णा सती॥ धेनूपूजन दिव्य ज्यांस घडलें आले कुलीं श्रीपती । शास्त्रें संत पुराण ग्रंथ सगळे प्रेमें स्तवीती जिला। त्या धेनू जननीस नित्य भजुनी व्हा धन्य या भूतला ॥ ५ ॥ गाई गोप गव्यांसहीत प्रभुजी प्रेमें वसे पंढरीं । गोमाता त्यजुनी न एक क्षणही राहे कधीं श्रीहरी । ऐसी वंद्य सुदेवता सुरगणां, जी आवडे विठ्ठला ॥ त्या धेनू जननीस नित्य भजुनी व्हा धन्य या भूतला ॥ ६ ॥ श्रीमत्सद्गुरु रामदास श्रमले गोविप्रसंरक्षणा ॥ राणा शौर्यनिधी शिवाजि सजला केली तया प्रेरणा॥ आशिर्वाद जिचा स्वराज्यसमयीं सर्वां जनां लाभला । त्या धेनू जननीस नित्य भजुनी व्हा धन्य या भूतला ॥ ७ ॥ अन्नाच्छादन अमृतोपम सुधा अर्पोनि साऱ्या जनां । ‘ माता ’ नाम यथार्थ शोभत जिला पुर्वीतसे कामना ॥ लोकीं कल्पलताच भासत दुजी पुष्टिप्रदा मंगला । त्या धेनू जननीस नित्य भजुनी व्हा धन्य या भूतला ॥ ८ ॥

—धेनुदास

## कवि—अनंताश्रितकृत.

# शेतकऱ्याचे उद्गार.

( चाल—मला मुंबईला०—)

नाही चत्कोर भाकर । घरा दारांतन रडत्यात पोर ॥धृ०॥ जळली शेतवाडी । नाहीं वैरण काडी । कशीं जगतील माझीं हीं ढोरं ? ॥ १ ॥ माझा पानाचा मळा । झाला सुकून काळा । नाहीं उसाला दिसत पेरं ॥ २ ॥ बाव गेली आटुन । मोटा बसल्या खुटुन । पाट फुटून गेल्यात सार ॥ ३ ॥ आभाळ पांढर शिपुर । नाहिं पाण्याचा धुर । काळी तापून गेलिया फार ॥ ४ ॥ माझी हिरकणी गाय । लई दुधाची हाय । पण आटली अवंदाच ठार ॥ ५ ॥ नाहीं चारापाला । कुठून आणूं बोला । फुकट घेऊन जावा हीं ढोरं ॥ ६ ॥ आतां नेतो ही गाय । उद्यां बाजार दावाय । घा. इस रुपय येतील का र ! ॥ ७ ॥ आणिन त्याच दाण । बायको दळुनशान । करील आंबील खात्याल पोर ॥ ८ ॥ (बाजारांत गेल्यावर ) काय रुपय चाळीस । एका पायांत देतोस । तूं कसाब हाईस कार ॥ ९ ॥ इतक रुपये देऊन । जासिल गाइला घेऊन । तिळा खायाला घालशील का र ? ॥ १० ॥ तूं हाईस कसाई । नाहीं इकायची गाई । मरल उपाशि माझ्याच म्होर॥ ११॥ अहो भटजीबुवा । पाऊस पडल कवा! । हाइति मृगाला दिस का फार ॥ १२ ॥ दिवस चांगला आला । रोहिणी मंडप पडला । अभाळ भरल्या ढगानं सारं ॥ १३ ॥ आतां पडल पाऊस । जीव धरील ऊस । चारा होईल गांवठाण भर ॥ १४ ॥ आतां नग इकाय । माझी यशवंती गाय । जाईन घेऊन शेतावर ॥ १५ ॥ भल्या पहाट उठून । आणिन तिला चारून । खाइल गवत—हिरवं

गार ॥ १६ ॥ मग धरील आंग । फेडिल लोण्याचा पांग । दही दुधाला येईल पूर ॥ १७ ॥ वाहवा पाऊस गळाय । लागला ! चला पेराय । अवंदा पिकतील शेतंबी फार ॥ १८ ॥ पाऊस पडला गांवांत । आतां वाढल गवत । चारा पाण्याची ददात झाली दूर ॥ १९ ॥ ऐसी कुणब्याची बात । ऐकुनिया कान्यांत । ठेवी गुंफून जगाच्या म्होर ॥ २० ॥ तुम्हां हात जोडी । कवी अनंताश्रित । पाळा गाईना घरोघर ॥ २१ ॥

---

## लावणी.

अहो बाई वाणी ! नसे आम्हांला कोणी ॥ धृ० ॥ गुण वानायाला । शब्द उणा झाला । समद्या पिर्तिमिला । गाय पाजीत सुखाचें पाणी ॥ १ ॥ माय मेली तरी । आपल्या बाळापरि । दूध पाजीत सुखाचें पाणी ॥ २ ॥ अहो गाईच श्यान । जणु दाण्याचि खाण । साऱ्या खताच ताण । करी शेतास सोन्यावाणीं ॥ ३ ॥ तेच्या गवऱ्या वळून । ठेवतां हुडग रचून । मग टाकतां विकून । दोन दोन गवऱ्याला एकेक आणी ॥ ४ ॥ गोमतरापासून । जाती रोग नासून । बसती डागदार रुसून । बघत आभाळ येड्यावाणी ॥ ५ ॥ दूध पितां तिचें । चिराल शत्रू साचे । बाळ वाघोबाचे । मिळतां हाता न धरील कोणी ॥ ६ ॥ बैल होतील ढाण । नाहि औतास वाण । ढीग डोंगरासमान । पडत दाण्याचा मोत्यावाणी ॥ ७ ॥ मंग बसून श्यानी । खावें ताक लोणी । दहीं दुध झणी । तुमची मिजास राजावाणी ॥ ८ ॥ दंड बैठक काढून । वर दूध पिऊन । हातीं तलवार घेऊन । शिवबा दुष्टाला चिणून हाणी ॥ ९ ॥ ज्या गाईसाठीं । हातीं घेऊन काठीं । कान्हा यमुनातटीं । उभा राहून पाजीत

पाणी ॥१०॥ अहो यंत्रापरी । रातदिवसभरी । कबाड कष्ट करी । त्याला मारता कां कसायखानीं ॥ ११ ॥ अशा गाई घरीं । तुम्ही पाळा परी । कसायाच्या करीं । नका देऊं मुका हा प्राणी ॥१२॥ कवि अनंताश्रित । तुमच्या पाया धरीत । नका करूं अनीत । धर्म विचार जरा न सोडी ॥ १३ ॥

---

कवि—खानविलकरकृत.

## गोमातेचा सवाल

१

### धार्मिकांना.

( 'तूं टाक चिरुनी ही मान' या चालीवर. )

तुम्ही हिंदु म्हणवितांना ? स्पष्ट बोला ॥ म्हणवितां हिंदु-मग कसा साहवे गोवध तुम्हांला ॥ध्रु०॥ तुम्हि वंशज छत्रपतींचे । गोब्राम्हण पालक यांचे । शिवराय बाजीरावाचे । महादाजी सुभेदारांचे होयना ? होय तरि कसा साहवे गोवध तुम्हांला ॥ १ ॥ सद्गुरु रामदासाचा । महा साधु तुकारामाचा । एकनाथ ज्ञानेशाचा । 'मी भक्त असे कीं साचा ' । म्हणवितां होय ना ? कसा पाहवे गोवध तुम्हांला ॥ २ ॥ रामेश्वर काशी करितां । सुक्षेत्रिं शिरें मुंडवितां । उपदेश घेउनी जपतां । गुरुमंत्र मणी ओढीता । परि ओढि कसाई गाय माइला दाद न तुम्हांला ॥ ३ ॥ दूध तूप नाहीं म्हणुनी । तरुण पिढी रोडावोनी । मरत मढीं पापी प्राणी । जाहलीं देखतां नयनीं । होयना ? होय तरि कसा पाहवे गोवध तुम्हांला ॥ ४ ॥ पूर्वींचा सुकाळ असे का ? दुष्काळ घडि घडि ये कां ?। शेतिची झालि दैना कां ? । आपत्ति चहुंकडे अशि कां ?। हे प्रश्न कधिं

तरी विचारितां कां सांगा स्वमनाला ॥ ५ ॥ कोणत्या तरी धर्माला । गोवध हा संमत झाला । दाखवितां कां तो मजला । शक्य हें असें कवणाला । नाहिंना तरी मग कसा पाहवे गोवध तुम्हांला ॥ ६ ॥

---

## चहाचें खूळ !

### ( २ )

तुम्हि हिंदु म्हणवितां ना ? स्पष्ट बोला ॥ म्हणवितां हिंदु मग कसा साहवे गोवध तुम्हांला ॥ ध्रु० ॥ गाय ही खुण हिंदूंची । हिंदूंच्या हिंदुत्वाची । हिंदूंच्या हिंद–संस्कृतिची । आज काय दुर्दशा तीची–! । उडविली तुम्ही ? पूर्वजांनिं तुमच्या रक्षीलें जीला ॥ १ ॥ कोणत्या हिंद संस्कृतिला । पाळायास्तव हो झटलां । खाद्य पेय वेषहि सुटला । पहा ! पहा ! आत्मचरिताला ! । नखशिखांत बनला पूर्ण विदेशी ! काल कुटिल आला ! ॥२॥ गोदर्शनस्मरणार्चनही । नित्य स्नानसंध्यासमयीं । कुणि हिंदु करिति कां पाही । ब्रह्मवीर ! ब्राम्हण ! तेही । "गायात्रिमंत्र" "गोग्रास" शब्द हे स्मरती कां ? बोला ॥ ३ ॥ "धारोष्ण" शब्द कवणाला । स्मरतो कां? पारखि झाला । महशूर शब्द-अर्थाला । लागेल कोश कळण्याला ! । धारोष्णाचा अर्थ आजला ठाउक कितिकांला ? ॥ ४ ॥ तें खूळ चहाचें पिकलें । आबाल वृद्ध ही सगळे । झोंकिती कितीदां पेले । धारोष्ण नको जाहालें । अमृत टाकुनि जहर विषाचा पेला आवडला ॥ ५ ॥ आनंदोत्सवही कसला । आज या चहांतचि घुसला । सन्मान चहांताचि बसला । विपरीत काळ हा असला ! । घुंवट सोंवळें ब्राह्मण बाया घेतीं चहाला । ॥ ६ ॥ गाईचीं खिलारें गेलीं ! । स्मरणांतहि ना तीं उरलीं । हरिकथा कथाया झाली ! ही काय उन्नती आली ? । सुशिक्षि-

तांनों, दिसत नाहीं कां ? दुस्थिति तुम्हांला ॥ ७ ॥ सुळसुळाट हॉटेलांचा! । खणखणाट कप् बशि यांचा ! । भजि ! बिस्किट ! पाव ! चहाचा ! । हा काय मार्ग उन्नतीचा ? । स्वदेशहित करणाऱ्यांनो ! हा सवाल तुम्हांला ! ॥ ८ ॥ घे बाळा म्हणुनी देतां । तो चहा मुला पाजीतां । कौतुकही त्याचें करितां । कां मृत्युमुखीं त्या देतां ?। मरतां तुम्ही तरि मरा ! मारितां कां परि पोराला ! ॥ ९ ॥ बहुपरी सभा भरवितां । बोलतो बृहस्पति वक्ता ! । श्रवण करी श्रवणीं श्रोता । हूं म्हणुनी टाळ्या पिटितां ! । परी चहापानाविण एकही सभा संपते कां ? ॥ १० ॥ हे दिवस न बोलायाचे । असती परि कृति करण्याचे । मन काय सांगतें तुमचें । आजला महत्व कृतींचें!॥ दिवसांतुनि कधिं विचारितां कां सांगा स्वमनाला ? ॥ ११ ।

---

## गोरक्षण-कवि पुष्पविहारी—

## पद

राग—भिमपलास; चाल—भास मला०

हांक किती मारूं । धांव गौरिबाला ॥ करुण अति कहाणी । परिसुनी दयाला ॥ ध्रु० ॥ दारुण स्थिति दैन्य भार । उफराटा काळ घोर ॥ परवशता सुरि कठोर । जाचिते जिवाला ॥ जनाला ॥ १ ॥ गोवध जगीं होई फार ! धर्माची हानि थोर ॥ सतत एक हाच घोर । जागवी जनाला ॥ मनाला ॥ २ ॥

---

## पद

चाल—सबसे राम.

हिंदु बंधुनो बोला–बोला सवाल हा केला। अपणा सवाल हा केला ॥ ध्रृ॰ ॥ अतुल–धवल कृति–कीर्ति गाजवुनि पूर्वज स्वर्गाला । गेले; त्यांला तोषवाल कां ? करुनी दिव्य कृतीला ॥ बोला॰ ॥ १॥ वधस्थानिच्या गोमातांच्या करुण वाणि हांकेला ॥ ऐकुनि धांवुनि सोडवाल कां ? । तोडुनि गळफांसाला ॥ बोला॰ ॥२॥ स्वत्व विसरुनी; परनादानें । भुलुनि फॅशनला । लावणार कां दीन जाहल्या । निजदेशास भिकेला ॥ बोला॰ २॥ हरुनि दास्य हें करुनि घ्याल । काधिं उदयकाल अपुला । झटाल कांहो ? द्वेष विसरुनी सारे देश–हिताला ॥ बोला॰ ॥४॥ सवाल आणिक करुनी नाहीं । सतावीत कोणाला । केले त्यांचें खुल्या दिलानें । उत्तर तरि द्या मजला ॥ बोला॰ ॥ ५ ॥

---

## दासमाधवकृत.

धांवा

( चाल—अजि अक्रुर हा॰ )

शिव शिव गोपाला करुणा काशि तुज येना । चालली पहा मम दैना ॥ ध्रु॰ ॥ मजसाठीं तूं धरुनी प्रभु अवतार । गोकुळीं सेविलें फार ॥ त्या सेवेचा झाला कां बहु भार । वाटला तुला जोजार ॥ नको नको होउं तूं कष्टी । वर्षुनी कृपेची वृष्टी । ठेवुनि दयामय दृष्टी । कृष्णाजी सुखी कर सृष्टी । किति तुजला मी श्रीपती विनवूं आतां । धांव धांव रुक्मिणकिांता ॥ १ ॥ बघ मानव हे अनुपकारि किति झाले । मम दुग्धें जे कां जगले ॥ मम संततिनें कष्टुनि ज्यां वांचविलें । ते कृतघ्न कैसे बनले ॥ मज विकिती ते वधिकाला

नाणिती चिंत्ति मम हाला । संतनी वरिहि तो घाला । ये दया न मम भूपाला ॥ हरि आवरि रे आवरि निद्रा सदया । येऊं दे पाझर ह्रदया ॥ २ ॥ किति ऋषिपंचमी वसुबारसही करिती । परि तत्त्व न त्यांतिल बघती । ज्या जीवांच्या कष्टांवर चाले शेती । निर्बल त्या होतां विकिती । हे विकितिल कां अशि आई । विष देउनि अन्य उपायीं । वधितिल कां पन्नगशायी । मी आइहुनि कमि कां कांहीं ॥ तरि मनुजांना सद्‌बुद्धी दे आतां।माधवा रक्ष रक्ष ताता॥३॥

---

कवि—श्री. हनुमंतराव फाळके

( चाल—थोर तुझे उपकार )

चेत करो मनकी प्यारे—चेत करो मनकी ॥ धृ० ॥ काया सारी घटत रैनदिन—खबर नही तनकी ॥ १ ॥ गोधन सारा कटत जात है—रटत माल क्या मनकी ॥ २ ॥ कली पुरुष यह ग्रसत गाय धन—तनक दया नहि उनकी ॥ ३ ॥ हाय हाय कर फिर पछतैहो—धुंदि जाय नयननकी ॥ ४ ॥ कहे हनुमंत सुनो मेरे भाई —करो रक्षा गोधनकी ॥ ५ ॥

---

( प्रभाती चाल—ताल दादरा )

कलजुगमें तारनेको येक हैगी गैया ॥ धृ० ॥ भवनदको पार करे । सकल पीर दूर करे । पापनको भस्म करे । धन्य मेरी मैया ॥ १ ॥ गौका जो दान करे । गौका जो मान करे ॥ वैतरणी पार करे । गाय हैगी नैया ॥ २ ॥ गौको दे जीवदान । तीन लोक उसे मान ॥ कौन है गौसमान । मुक्त करन भैया ॥ ३ ॥ बिनति करू हात जोड । कलजुगकी बेडी तोड ॥ पापनसे मुख मरोड । पुण्यकी बलैया ॥ ४ ॥ गौको जो मार देत । पुण्य सकल नष्ट होत ॥ जम

राजा रुष्ट होत । मारत हा दैया ॥ ५ ॥ रो रोके शब्द कहैत । कोउ ना मुक्त करत । करनी सम फल मिलत । कौन है छुडैया ॥ ६ ॥ कहे हनुमंत पुकार । बिनति करत बारबार ॥ गौओंके कष्ट टार । जाग रे कन्हैया ॥ ७ ॥

---

गौ परम पावनी गंगा है । गौ दुग्ध इसीसे चंगा है ॥धृ०॥ गंगाजल निर्मल अति भारी । दूर करे सब दुख बेजारी । पावन होत सकल नरनारी ॥ गौबिना जगत यह नंगा है ॥ १ ॥ गाका दुग्ध पिवे जो कोई ॥ उसका पूर्ण मनोरथ होई ॥ शक्ति, जविन हाथमें आई ॥ गोबिना जगत यह नंगा है ॥ २ ॥ इहपर लोक दोउको तारे । वैतरणीसे पार उतारे ॥ तिहूं लोक होत उजियारे ॥ गोबिना जगत यह नंगा है ॥ ३ ॥ गोगंगा यह सगी बौहैन है ॥ दत्तगुरूके संग रहत है ॥ भव बाधाको दूर करत है ॥ गौबिना जगत यह नंगा है ॥ ४ ॥ बिनति करत हनुमंत जोड कर ॥ ध्यान देवो तुम गोरक्षापर ॥ संतति संपात्ति बढे इसीपर ॥ गौबिना जगत यह नंगा है ॥ ५ ॥

---

## पद.

### कवि—अनंत जिवाजी कमतनूरकर; बेळगांव कृत

( चाल—आनंदाचा कंद हरि० )

धांव ! दयाळा, संकटिं तारी ! धेनूमाता हंबरडे ॥ भक्तां-साठीं, तूं जगजेठी, कावडि पाणी वाहिलें ॥ धृ० ॥ अधम पातकी आर्य जाहले, कापिति माझी मान पहा ॥ हे वनमाली, मज सांभाळी नेत्रा दिसतें रूप अहा ॥ १ ॥ रक्तपाट वाहोनी झाली, ही भू-माता लाल कशी ! ॥ धांव ! झडकरी, धांव ! मुरारी; आशा तंतू

तूंचि रे ॥ २ ॥ सत्त्व दुग्ध पाजियलें यांना,विष वमती हे घोर किं रे ॥ व्यसनीं फसलें, मज लोटियलें, देई चरणीं ठाव रे ॥३॥ पुत्र नसति हे चांडालचि रे, पूर्वजन्मिचे वैरि खरे ॥ अंतरिं भक्ति न, कामासक्ती, हृदयाविदारण होईरे ॥ ४ ॥ अनंत कविसी काव्य कराया, देई बुद्धी श्रीरंगा ॥ हे भवभंगा चरणीं गंगा, वाहे निशिदिनीं झुळझुळरे ॥ ५ ॥

---

# पद.

कवि—शंकर रामचंद्र अर्जुनवाडकर बेळगांवकृत.

( चाल—त्यजी भक्तासाठीं लाज० )

द्या सोडुनि सारी चैन । वापरा स्वदेशी कपडा ॥ धृ० ॥ ' काढूनि ' सूत स्वकरानें । त्यापासुनि बनवा वसनें । वाढवा'कला' अभिमानें । परदेशी माला दवडा ॥ १ ॥ तंतूपट यंत्रें झालीं । जननयना भूलचि पडली । कुशलता कला ती दडली । परक्याविण न चले गाडा ॥ २ ॥ नेक्टॉय–कोट–ज्याकीटा । द्या मखमलीस जी फांटा । किति झाला आजवरि तोटा । तरी नेत्र आतां उघडा ॥ ३ ॥ ' भगिनींनो ' हें व्रत पाळा । तंतू कृति शिकवा बाळा । ठेवूनि घरीं चक्राला । स्वकरेंचि वसनें काढा ॥ ४ ॥ गोरक्षणिं काया लावा । गोमाता घरीं सांभाळा गोवध आजवरी झाला ॥ तरी नेत्र आतां उघडा ॥ ५ ॥

---

कवि—ल. स. पत्कीकृत.

## पद.

( चाल—वसंतीं बघुनिमेनकेला )

मनीं भेद जिच्या नाहीं । आर्य यवन वा असो अन्य जन । चोर कसाईही ॥ धृ० ॥ दुग्ध दधि नवनित दे त्याला । द्रव्यहीन मापती असो वा कृपणहि दात्याला ॥१॥ कनक वा मृद्घट जरि नेला । तरी समचिदे दुग्ध माउली वृद्ध तरुण बाला ॥ सुकन्या पुत्र जरि झाला । तरी सारिखे देत क्षिर ती स्वामि सेवकाला ॥ शेवटीं प्राण जरी जाई । तरी उपानह पदीं होऊनी सौख्य तुम्हां देई ॥ २ ॥

---

कवि—ह. भ. प. रामचंद्र अनंत शिरवळकर.

### चाल—फटका

अहो हिंदुनो, हिंदु म्हणविण्या लाज तुम्हांला वाटे ना । गोमातेचा विकरा करितां करुणा किंचित येईना ॥ धृ० ॥ त्या गाईचा हंबरडा तो ऐका ऐका कानानें । हांक मारिते अश्रु ढाळिते खुशाल बघतां नेत्रानें ॥ १ ॥ कर्णबधिरता झाली किंवा नेत्रा अंधेरी आली । हिंस्त्र पशूसम निर्दय बनला व्यर्थ तुम्हां जननी व्याली॥२॥ ताक मिळेना भातावराति दूध तूप हें नांव नको । परि व्यसनें हीं कशीं लागलीं चहा, कॉफि ती आणि कोको ॥ ३ ॥ चहा घेउनी पहा शरीरें गालहि खप्पड झाले कीं । आयुष्याची माती झाली आमंत्रण ये ' क्षय ' नक्की । ॥ ४ ॥ सुजन सुशिक्षित बांधव जनहो अजुनि तरी सावध व्हा हो । वधस्थानिं ज्या गायी जाती प्राणदान द्या त्यांना हो ॥ ५ ॥ शेतीची ती माती झाली महर्गतेनें ' आ '

केला । कारण याचें शोधूं जातां अपुलें आपण कीं झाला ॥ ६ ॥ गोहत्येचें पातक झालें राष्ट्रामध्यें किती तरी । नुकसानीचा पाया सारा, याची गणती कोण करी ॥ ७ ॥ हे श्रीरामा, मंगलधामा, हे श्रीकृष्णा धांव तरी । या गायीस्तव अवताराची पुन्हां एकदां खेप करी ॥ ८ ॥ अनंतसुत कवि पाया पडतो दया येऊं द्या हिंदूंना । हीच प्रार्थना चरणीं कृष्णा कुंजाविहारी मधुसुदना ॥ ९ ॥

---

गोसेविका—**मनुबाई बापट**

## भगिनीवर्गास प्रार्थना

भागिनिनो चलागे या या । गोग्रास मुष्टि मागाया ॥ ध्रु० ॥ ह्या भरतभूमीचीं रत्नें । संरक्षण करुं या यत्नें । धनधान्य विपुल भोगाया । वि० ॥ १ ॥ व्हा धीट बांधुं या कमरा । आनंदें झोळि स्वीकारा । सुप्रेमें धेनुगीत गाया ॥ धे० ॥ २ ॥ चंद्रसूर्य धेनुच्चे नेत्र । देव वसती देहिं सर्वत्र । नका जाऊं फतर पूजाया । फतर० ॥ ३ ॥ करूं अल्प स्वल्प ही सेवा । मग पाठराखी गुरुदेवा । पद–कमळीं भाळ ठेवूं या । भा० ॥ ४ ॥ गोवृंद प्रिय गोपाळा । संकटीं राक्षि धेनूला । लक्षुमी रतली तव पाया । रत० ॥ ५ ॥

## स्फुट–श्लोक.

फुकाचे तृणा खाउनी तुष्ट होते । पया देउनी जी तुम्हां तुष्टवीते । सदा चिंति जी सौख्य सर्वांस व्हावें । कसें हो तया धेनुला वीसरावें ॥ १ ॥

## शिखरिणी.

मुकुंदें गोसेवा विविध परि केली शिशुपणीं । तटीं कालिंदीच्या साहित बळरामादि जपणी ॥ अशा गोमातेला भरतजनता–संघ विटला ॥ म्हणोनी दुष्काळें सकल अपुला देश नटला ॥ २ ॥

### मालिनी

सकल सुखधनाचा धेनु हा जाण ठेवा ॥ हरि–हर–विधि जीची इच्छिती पाद सेवा ॥ पयदधिघृतयोगें लाभ जीचा घडावा॥ शिव शिव शिव ऐशा गाइचा खून व्हावा ॥ ३ ॥

### श्लोक

राजा दिलीप नरपुंगव सूर्यवंशीं ॥ गोरक्षणीं निज अमूल्य शरीर दंशी ॥ प्राणांहुनी बहुत आवडली जयाला ॥ त्या गाईला परम दुस्तर काळ आला ॥ ४ ॥

### शार्दुल विक्रीडित

हिंदूलोक समस्त षंढ बनले गोरक्षणीं वाटतें ॥ गोरक्तें भिजली जमीन बघुनी काळीज हें फाटतें ॥ ज्यांचे पूर्वज बांधिती निज करीं गोरक्षणी कंकणें ॥ त्यांचा वंशज आज लाज विकुनी हातीं भरी काकणें ॥ ५ ॥

### मंदाक्रांता

कां हो देतां निजजननिसी खाटिकाच्या करांत ॥ नाहीं जागा जननी पुरती हिंदूच्या ही घरांत ॥ गोमातेचा वध करवुनी कोणता लाभ झाला । हा हा कैसा जननिवरती घोर हा काळ आला ॥ ६ ॥ धर्माच्या या जिवलग जिवा मारितातो कसाई ॥ हें पाहोनी नयनीं तुमच्या अश्रुचा थेंब नाहीं ॥ भूलिंगाला निशि-दिनीं करूं धेनु रक्ताभिषेक ॥ ऐसा केला नवस विभुला काय हो हाय शोक ॥ ७ ॥ लाखो गाई मराति तरिही ज्यास आनंद वाटे ॥ ऐसा लोकीं मनुज मजला एक हिंदूच वाटे ॥ गोरक्ताचा चिखल बघुनी रक्त ज्याचें न तापे ॥ ऐशा षंढा मनुज म्हणतां हाय काळीज कांपे ॥ ८ ॥

---

## श्लोक

आणा हो आणा धर्म गोरक्षणासी ॥ नका खिन्न होऊन देऊं मनासी ॥ असे गाय ही माय जाणोनी कष्टीं ॥ तिच्या जविदानास द्या धान्य–मुष्टी ॥ ९ ॥ नका रंग ढंगामधें नित्य लोळूं ॥ जरा गाइसाठीं बना हो कृपाळू ॥ जिच्यानें तुम्हां होय कल्याण पुष्टी ॥ तिच्या जविदानास द्या धान्य मुष्टी ॥ १० ॥ असे आर्य धर्मामधें मुख्य गाय ॥ तिच्या संकटा नेणती आर्य काय ॥ जिये पासुनी उद्भवे सर्व सृष्टि ॥ तिच्या जीवदानास द्या धान्य–मृष्टि ॥ ११ ॥ नसे एक पैसा रुपायास भारी ॥ तयानें तुम्ही व्हाल कांहो भिकारी यमाची आणा मानसीं तीक्ष्ण यष्टी ॥ उठा धेनुमातेस द्या धान्य मुष्टी ॥ १२ ॥ अहो माय बहिणी पडो दुःख कर्णीं ॥ सदा तान्हुल्या अर्पितां दूध लोणी ॥ तियेची दया पूर्ण ठेवानी पोटीं ॥ उठा धेनु मातेस द्या धान्य--मुष्टी ॥ १३ ॥ उठा हो उठा झोंप कैसी प्रभातीं॥ असे संपली गाढ अज्ञान राती । कसाई पहा चरचरा कापी गाय ॥ कसे मंचकीं लोळतां स्वस्थ हाय ! ॥ १४ ॥ अहा हंबरे धेनु आर्तस्वरें हो ॥ नसे श्रोतृ ऐकावया काय टाहो ॥ उठा कैशि हो नीज येई तुम्हांला ॥ यथाशक्ति द्या साह्य गोरक्षणाला ॥ १५ ॥ न धेनु तुम्हां विक्रयालागीं केली ॥ स्वमाता तशी सेवण्यां योग्य झाली ॥ विकी धेनु तो सत्य चांडाळ जाणा ॥ तयाच्या कुसंगा मनीं वीट आणा ॥ १६ ॥ तुकाराम ते सांगती आग्रहानें ॥ न गाई विकाव्या भल्या माणसानें ॥ विकी धेनु तो शुद्ध चांडाळ देखा ॥ घडावा न संपर्क त्याचाही लोका ॥ १७ ॥

## पद.

### गोलोकवासी न. रा. येरीकरकृत.

( चाल—आनंदाचा कंद हरि० )

श्रीगोपाला नंद कुमारा धांव ह्मणीं मधुसूदना ॥ ध्रु० ॥ दुग्धपान करुनियां बालपणि कंस चाणुरा मर्दुनी । भो जगदीशा, भारतदेशा, रक्षियलें करुणाघना ॥ १ ॥ रामकुमर तव पदास विनवी ध्यास लागला अंतरीं । ही गोमाता शिणली आतां, कां करुणा तुज-येइना ॥ २ ॥ .

---

## पद

धांवुनि ये आतां । गोविंदा गोपाळा ह्मणि । धांवुनिये आतां ॥ धृ ॥ त्वत् प्रियकर गाई । वधिती दुष्ट कसाऽऽई । कां न दया ये अजुनी । गोपाला ह्मणी ॥ १ ॥ गोवर्धनधारी । सखया कृष्ण मुरारी । गांजियलें असुरांनीं । गोपाला ह्मणी ॥ २ ॥ भारतधर्मातें । रक्षुनि दे सुखाऽतें । बहु रडते ही अवनी । गोपाला० ॥ ३ ॥ राम-कुमाराला । दावी पद कमलाऽऽला । लय लागो गोचरणीं । गोपाला ह्मणी० ॥ ४ ॥

---

# हंबरडे

( कै. कबाडे शास्त्रीकृत. )

**पोवाडा**—( धन्य शिवाजी तो रण० )

प्रतिक्षणीं भासतें सुरीनें चिरिलें हें नरडें ॥ हंबरडे फोडिते द्रवे स्थिरचरपाषाण रडे ॥ धृ० ॥ गरुडवाहना वायुगतीनें गोपाला धांवें ॥ होइल वाटे पाश मृत्युचा मानेचें दावें ॥ ज्यांचेसाठीं आजवरी हें शरीर झिजवीलें ॥ तेच खाटिका—हातीं द्याया सिद्ध पहा झाले ॥ दूध पाजिलें भुजंगमाला अतुल बली केलें ॥ विष वमला तो कारण नाश मीच विभो सृजिलें ॥ संकटीं घाल उडि घाल ! धांव गोपाल । धांव गोपाल ॥ जगिं केवळ कृतघ्नताच । अजि नांदे अनुभव हाच । मज देवा आला साच । हो बाह्यांतर मज जाच ये ये सोडविं जीव वांचवीं घालीं पाठिकडे ॥ हं० ॥ १ ॥ वसिष्ठमुख हे ऋषिरायांनो शापचाप सजवा ॥ उपास्य तुमचें गायत्री मी रक्षा मज्जवा ॥ मला विसरुनी वंशज तुमचे हीनवीर्य झाले ॥ सत्वहीन तामसी तन्मतीं उन्मार्गीं चाले ॥ त्यजिलें सेवन करिती कीव न जीव संशयीं या ॥ उलट खाटिका सज्ज विकाया काय म्हणावें या ॥ हे गुरू विप्र वर्णास । अनुसरे यांस । सकल जन खास ॥ जरि तेच जाहले अंध ॥ भलतेच घेऊनि छंद ॥ इतरांस काय निर्बंध ॥ ते बोलुनि चालुनि मंद ॥ रक्षाया मज निज तेजाचें करां चक्र गाढें ॥ हं० ॥ २ ॥ धांव दिलीपा मत्सेवेनें तनय तुला झाला ॥ गोद्विजपालक या भूपांनो चुकवा हा घाला ॥ अशा सोडा वंशज तुमचें ब्रीद पाळितील ॥ पहा नभांतुनि ढंग तयांचे सहजाचि दिसतील ॥ रक्षक झाला भक्षक तरि मग शरण कुणा जावें ॥ दीन म्हणुनि मी हांक फोडितें नृप हो! धांवावें ॥ सुरूं करणें शरसंधान!

नं. ... ता. ...

रक्षणें मान । सोडवुनि मान ॥ परिसिला काय हंबरडा । पैजेचा उचला विडा ॥ ही वारा वारा पीडा । निजकीर्ति दिगंता धाडा ॥ त्वरा न केली तरी पहाया मिळेल कीं न मढें ॥ हं० ॥ ३ ॥ मद्रक्ताचा सडा घातला आर्यभूमिवरती ॥ दाट खलांहीं धांवलासि तैं तूंच खरा नृपती ॥ शिवराया शिव धांव कराया गोब्राह्मणपाळ ॥ नांव सार्थ करिं वदती तुजला दुष्टांचा काळ ॥ पिउनि अमृतमय माझें पय जे बलसागर झाले ॥ खलसांगातीं मन्मांसा ते भक्षाया सजले ॥ हा अधर्म माते फार । भूमिला भार । जाहला थोर ॥ ती धेनूरूपें रडते। हें कानिं काय ना पडतें । कां अवतरणें ना घडतें । अघ बिरुदहानि हें जडतें ॥ निर्गुण अपुला ठाव सोड गा धांव धेनुचाडें ॥ हं०॥४॥ गव्यांवरती ज्यांना ज्यांना सुख झालें प्राप्त॥ ते ते धांवुनि येतिल माझे पूर्वीचे आप्त ॥ लोभी आपुल्या वंशजांस ते मंत्र सांगतील ॥ धेनुकृपेनें रंकहि धनपति कुबेर होतील ॥ मानित होतों धन धेनूंना वत्सांसह आम्ही ॥ असंख्यात पाळिलीं पोशिलीं होती निजधामीं ॥ व्हा व्हा रे सावध बाळ । त्यजा हें खूळ । गाय सुखमूळ ॥ ती द्यावि कदा न वधाया ॥ दुःखाचा न रचा पाया ॥ स्वर्गातुनि होचि कथाया ॥ आलों न करा श्रम वायां ॥ विस्मरतां हें वचन आमुचें तुम्हां घोर पडे ॥ हं० ॥ ५ ॥ शेतकऱ्यांनों ऐका माझें करुण वचन ऐका ॥ माझ्याहुनि कां अधिक वाटतो तुम्हांला पैका ॥ थोरवाड किति पाडे दिधले करिती ते कष्ट ॥ त्यांविण तुमची हल न काडी कथितें मी स्पष्ट ॥ शेणमूतही पित्तहि माझें तुम्हांस उपयोगी ॥ सेवन ऐसें केलें जाणा तुमचे बहुमार्गीं ॥ वय माझें झालें फार । मिळेना धार ॥ वाटला भार ॥ विकिलीत म्हणुनि माराया ॥ मांसाचा पैका घ्याया ॥ चर्माची मोट कराया ॥ धिक्कार असो लोभा या ॥ काम न करिते

REFBK-0003688
REFBK-0003688

माय कोणी कां विकायास काढे ॥ हं० ॥ ६ ॥ अप्रातिहत जरी चालू दिधला अमुचा संहार ॥ चित्रांतचि तरि पुढिल पिढीला गाई दिसणार ॥ दूध धेनुचें शुभ्र मुलांनों जैशी कां निवळी । आजानें हा पाठ कथावा समय असा जवळीं ॥ पाडे जातिल येइल यंत्र क्षेत्र नांगराया ॥ परावलंबन जडेल आर्यां करा विचार या ॥ जरि दुजा यंत्र हालवी । तया चालवी । धान्य भूमि वी ॥ तरि मिळेल तुम्हां पोटा ॥ हा मार्ग परी न चखोटा ॥ भासेल तदा मम तोटा । अनुताप घडे मग मोठा ॥ वेळीं व्हा हो सावध पारिसा ही गो अंबरडे ॥ हं० ॥ ७ ॥ वत्स ठेवुनी अर्धपोटिं मीं दूध तुम्हां दिधलें ॥ मदुपकार कां वाटति फिटले जरि मजला वधिलें ॥ पापांमाजी कृतघ्नता हें पाप फार मोठें । कृतघ्नास सुख, वैभव शांती लाभते न कोठें ॥ आला याचा अनुभव तुमची दुर्दशाच झाली ॥ बहुमुख झाला अध:पात कुणि उरला ना वाली ॥ मी तुम्हां पाजिती माय विकुनि मज काय । पावलां हाय ॥ कां पडतां रे उपवासी ॥ कां मिळे न लव पोटासी ॥ कां दुर्बलता ये ऐसी ॥ या हेतु विसरला मजसी ॥ पूर्वीं परि मी तुम्हां सेवितें केलें मन न कुढें ॥ ॥ हं०॥ ८ ॥ बाळपणीं जें प्याला माझें दूध थेंब त्याचा । शोणितरूपें आज शरीरीं असेल जरि साचा ॥ ऐकुनि माझे हंबरडे हे उसळुनि तो माथां ॥ चढेल मातें रक्षायातें उचलविल हातां ॥ स्मृति बाल्याची असेल जरि ते शेषा तिळमात्र देइल जाणिव धेनु असें मी रक्षाया पात्र ॥ खाटिकें काढिली सुरी । जाहली पुरी । मुदत मम तरी ॥ राहिले शब्द तोंडांत ॥ मालवेल जीव–ज्योत ॥ प्रभुचरण राहतें ध्यात ॥ लाभेल स्वर्गप्रांत ॥ श्रीगोपालप्रभु तेथें मज उचलुनि घेइ कडे ॥हं० ॥ ९ ॥ दशा पाहुनि गळतिं आसवें चरचरतें हृदय ॥ जशीं वासरें तशीं लेंकुरें तुम्ही न मज काय॥

३५८८

माझ्या धर्मे वागुनि संतत आळवीन देवा ॥ प्रार्थिन त्याला लेंकरांस दे सन्मतिचा ठेवा ॥ माझें मन मज देतें ग्वाही अहित न होईल ॥ माझ्या पुण्यें शुद्धिवरी हा समाज येईल ॥ तुम्हि जरी मूढ जाहलां । वधा सज्जला ॥ राग ना मला । मी देतें तुम्हां आशी ॥ भोगाल बाळ सुखराशी ॥ मी जातें वैकुंठासी ॥ गो--पालक विष्णूपाशीं ॥ वियोग तुमचा सहावया परि शक्ति न येइ रडें ॥ हं० ॥ १० ॥

॥ श्रीमद्गोपालकृष्णार्पणमस्तु ॥

---

# हंबरडा फोडी गाय !

कवि—**दत्तात्रय तुकाराम पणशीकर** पेडणें, गोंवा.

( चाल–उद्धवा शांतवन कर जा )

" सोडवा आपुली माय !" हंबरडा फोडी गाय ! ॥ धृ० ॥

" करकरून मज बांधोनी । हे कसाब चिरिती मान ॥ या यारे ! कुणि धांवोनी । घुटमळती पंचप्राण ! ॥ आर्य हो ! तुम्हांवांचोनी । रक्षिल मज सांगा कोण ? ( चाल ) जावें मी शरण कुणातें ? । हिंदूविण माझें नातें ॥ पाळील कोण सांगा तें ॥ मी अनाथ झालें काय?" हंबरडा फोडी गाय ! ॥ १ ॥ " वांसरें लोक यांमाजीं । अंतर मी धरिलें काय ? ॥ बांधुनि मम पाडस पिळितां । पान्हवलें नाहीं काय ? ॥ मम गोरस सेवुनि, झालां । पुष्ट, तें विसरलां काय ? ॥ ( चाल ) पान्हा मी तुमच्या बाळा ॥ घातलें खाउनी दिधला ॥ जरि बडगा मजवरि बसला ॥ तरि धन्या चाटिलें ! हाय !" हंबरडा फोडी गाय ! ॥२॥ "सद्गुणी पुत्र माझे मी । सेवेसी तुमच्या देतें ॥ ते तुम्हां अन्न द्यायाला । नांगरती तुमचीं शेतें ॥ वाहती तुम्हां सुख व्हाया । गाडीच्या सबळ धुरेतें ॥ ( चाल ) उसळतां तीक्ष्ण आसूड ॥ ओढिती गाडिचें धूड ॥ उपकृतिचा मजवरी सूड॥

३६८८ ग्रं. क्र.



उगवला जात हा काय ?" । हंबरडा फोडी गाय ! ॥ ३ ॥ " करितें कीं शेणखतानें । मी सुपीक तुमचीं शेतें ॥ मरुनीही तुमच्या पायां । कातडिचा जोडा देतें ॥ ऐशापरि तुमच्या काजीं । हाडांचीं काडें करितें ॥ ( चाल ) जी तुम्हां जन्म दे जननी ॥ मज अशी करी का करणी ? ॥ पाहिली कुणी का नयनीं ? ॥ परि मीच मात्र असहाय !" हंबरडा फोडी गाय ! ॥ ४ ॥ " दूध तूप देउनि सकलां । मी कडबा पेंढा खातें ॥ मी मुकें जनावर दावें । ज्यास द्याल तिकडे जातें ॥ ब्राह्मण वा कसाइ हो कां ! सारिखा पान्हा देतें ॥ ( चाल ) हें समता—शीलाचि नकळे ? ॥ कापाया चरचर सजले ! ॥ प्रभुला तरि कैसें रुचलें ? ॥ आर्य धर्म मेला काय ?" । हंबरडा फोडी गाय ॥ ५ ॥ " सिंहमुखीं कंठ जयानें । मजकरितां आपुला दिधला ॥ तो दिलीप लेंकरूं माझें ! । तो पित वसिष्ठहि गेला ॥ रामदास आणि शिवाजी । गेला रे ! गेला ! ! गेला ! ! ! ( चाल ) जाहलें दारची भाजी ! ॥ उठतो तो खुडितो ताजी ॥ गाजीचे बनले पाजी ! ॥ मोकालितें दुबळी धाय !" हंबरडा फोडी गाय ॥ ६ ॥ " मुसलमान बंधुहि माझी । ऐकुनियां हांक थरारे ! ॥ हिंदूनो ! मेलां कारे ! । त्यांची तरि लाज धगारे ! ॥ आहांत हिंदु रक्ताचे ! । ख्रिस्त्यांस उठुनि विनवारे ! ॥ ( चाल ) धेनुच्या दावणी बघतां । आर्तस्वर कानीं पडतां ॥ सुखनिद्रा कसली घेतां ? ॥ यश अक्षय; वैभव जाय " । हंबरडा फोडी गाय ॥ ७ ॥ प्राणांहुनि गोधन आर्यां ! । प्रिय होतें; प्राक्तनवाद— ॥ टाकुनियां; गोमातांचा । अंतींचा ऐका साद ॥ मृत्यूच्या दारांतुनि हा । देतें शुभ आशीर्वाद ॥ ' गोरक्षण घेउनि हातें । घर भरोत शेतेंभातें । तुमचें शुभ चिंतित जातें' । शुभ चिंतित मरते गाय । दृष्टांत सुचवि हा काय ? ॥ ८ ॥

# श्रीगोवर्धन पुस्तकमाला.

---

## एकवार अवश्य वाचा.

१. खरें गोरक्षण ~)८

२. शुभलग्न पण सावधान ~)८

३. व्यसन सम्राट यांचा दरबार ~)८

४. धेनुगाथा ~)२

५. ' माझी भवळी ' ( पोवाडा ) ~)२

६. गोवर्धन पद्यावली ~)२

७. गोवर्धन नाट्य संवाद ~)४

( १ ) ऐक्याचा सूर्योदय, ( २ ) गोसेवा हीच खरी वि[illegible]
( ३ ) संडे प्रोग्राम.

८. श्रीरामदासी सांप्रदायिक उपासना पद्धति ( श्रीचौंडेमहाराजांच्या ८० पृष्ठांच्या बहुमोल प्रस्तावनेसह ) ~)८

९. श्रीसमर्थांचा जयजयकार अथवा सद्गुरुस्तवन ~)२

१०. घरगुती दुधदुभतें ~)६

सर्व पुस्तकें एकदम घेणारास पाऊणपट किंमत पडेल. ट. ख. वेगळा, [illegible]च्या आंत व्ही. पी. केली जाणार नाहीं.

श्रीगोवर्धन संस्था कचेरी,
बुधवार पेठ, पुणें शहर

-शंकर रामचंद्र दाते, लोकसंग्रह छापखाना २७ बुधवार पेठ पुणें.
--- शंकर सखाराम डोळे, व्यवस्थापक, गोवर्धन संस्था,
बुधवार पेठ पुणें शहर.

दा. क्र. ३५८८



उगवला जात हा काय ?" । हंबरडा फोडी गाय ! ॥ ३ ॥ " करितें कीं शेणखतानें । मी सुपीक तुमचीं शेतें ॥ मरुनीहि तुमच्या पायां । कातडिचा जोडा देतें ॥ ऐशापरि तुमच्या काजीं । हाडांचीं काडें करितें ॥ (चाल) जी तुम्हां जन्म दे जननी ॥ मज अशी करी का करणी ? ॥ पाहिली कुणी का नयनीं ? ॥ परि मीच मात असहाय !" हंबरडा फोडी गाय ! ॥ ४ ॥ " दूध तूप देउनि सकलां । मी कडबा पेंढा खातें ॥ मी मुकें जनावर दावें । ज्यास द्याल तिकडे जातें ॥ ब्राह्मण वा कसाइ हो कां ! सारिखा पान्हा देतें ॥ (चाल) हें समता-शीलाचि नकळे ? ॥ कापाया चरचर सजले ! ॥ प्रभुला तरि कैसें रुचलें ? ॥ आर्य धर्म मेला काय ?" । हंबरडा फोडी गाय ॥ ५ ॥ " सिंहमुखीं कंठ जयानें । मजकरितां आपुला दिधला ॥ तो दिलीप लेंकरूं माझें ! । तो पिता वसिष्ठहि गेला ॥ रामदास आणि शिवाजी । गेला रे ! गेला ! ! गेला ! ! ! (चाल) जाहलें दारची भाजी ! ॥ उठतो तो खुडितो ताजी ॥ गाजीचे बनले पाजी ! ॥ मोकालितें दुबळी धाय !" हंबरडा फोडी गाय ॥ ६ ॥ " मुसलमान बंधुहि माझी । ऐकुनियां हांक थरारे ! ॥ हिंदूनो ! मेलां कारे ! । त्यांची तरि लाज धरारे ! ॥ आहांत हिंदु रक्ताचे ! । खिस्त्यांस उठुनि विनवारे ! ॥ (चाल) धेनुच्या दावणी बघतां । आर्तस्वर कानीं पडतां ॥ सुखनिद्रा कसली घेतां ? ॥ यश अक्षय; वैभव जाय" । हंबरडा फोडी गाय ॥ ७ ॥ प्राणांहुनि गोधन आर्यां ! । प्रिय होतें; प्राक्तनवाद- ॥ टाकुनियां; गोमातांचा । अंतींचा ऐका साद ॥ मृत्यूच्या दारांतुनि हा । देतें शुभ आशीर्वाद ॥ 'गोरक्षण घेउनि हातें । घर भरोत शेतेंभातें । तुमचें शुभ चिंतित जातें' । शुभ चिंतित मरते गाय । दृष्टांत सुचवि हा काय ? ॥ ८ ॥